मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले

। मुख्य संपादक - भारती आमले । उपसंपादक - श्री विलास गायकवाड । कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे । निवासी संपादक - श्री राकेश पाटील । सह संपादक - श्री मुकुंद कांबळे । महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : 87 शुक्रवार, 05 डिसेंबर 2025 किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## () थोडक्यात ()

### श्री गणेश दत्तात्रय बच्छाव यांची थेपडे विद्यालय,म्हसावद येथे प्राचार्य पदावर नियुक्ती



***दैनिक युवक आधार जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील***

ब.ग. विश्वस्त निधी,अडावद या संस्थेच्या स्वा.सै.पं.ध.थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,म्हसावद येथे श्री गणेश दत्तात्रय बच्छाव यांची १ डिसेंबर २०२५ पासून प्राचार्य पदावर संस्थेचे चेअरमन मा.श्री केदारजी थेपडे व सर्व विश्वस्त मंडळ यांनी नियुक्ती केली. २८ वर्षापासून गणेश बच्छाव सर शाळेत सेवेत असून ४ वर्षापासून उपमुख्याध्यापक पदाची जबाबदारी सांभाळत होते. मागील १५ वर्षापासून जळगाव जिल्ह्यात इंग्रजी विषयाचे तज्ञ मार्गदर्शक ,मेंटॉर तसेच राज्यस्तरीय निवड श्रेणी प्रशिक्षक म्हणून देखील कार्य करत आहे. English Teachers' Welfare Association Jalgaon (ETWAJ) संस्थेचे सचिव पदावर कार्यरत आहेत. श्री गणेश बच्छाव यांची थेपडे विद्यालयाच्या प्राचार्य पदी नियुक्ती झाल्याबद्दल संस्थेची चेअरमन मा. श्री केदारजी थेपडे, श्री पी डी चौधरी, मुख्याध्यापक नूतन ज्ञान मंदिर अडावद, उपमुख्याध्यापक श्री एस के भंगाळे, पर्यवेक्षक श्री के पी पाटील, शिक्षक प्रतिनिधी श्री सचिन चव्हाण, उच्च माध्यमिक विभाग प्रमुख श्री योगराज चिंचोरे, शाळेचे लिपिक श्री विजय वाघ, पंकज काटकर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, सकाळ पेपर चे विक्रेता श्री. कदीर पटेल तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी त्यांचे पालक, म्हसावद व परिसरातील सर्व खेड्यातील नागरिकांनी हार्दिकअभिनंदन केले.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व शाळेची प्रगती करण्याचा मानस यावेळी नवनियुक्त प्राचार्य श्री. गणेश बच्छाव सर यांनी व्यक्त केला

# वर्षानुवर्षे एकाच विभागात असलेल्या कर्मचाऱ्यांची होणार चौकशी

## जन गाऱ्हाणी दिनातील तक्रारींनंतर उपायुक्तांनी मागवला अहवाल




मुंबई : मुंबई महापालिकेच्या मालमत्ता आणि सुधार या दोन विभागांमध्ये काही अधिकारी, कर्मचारी हे गेल्या सुमारे दहा ते बारा वर्षांपासून एकाच विभागात कर्तव्यावर असून पालिकेच्या मालकीच्या चाळींच्या पुनर्विकासात हे कर्मचारी विकासकाला मदत करीत असल्याचा आरोप या चाळीतील रहिवाशांनी केल्यानंतर या प्रकरणी आता चौकशी होणार आहे. या प्रकरणात चौकशी करून त्याचा अहवाल सात दिवसांच्या आत सादर करावा असे आदेश उपायुक्तांनी मालमत्ता विभागाला दिले आहेत.

मुंबई महापालिकेच्या मालकीच्या इमारती मुंबईत शहर भागात विविध ठिकाणी आहेत. या इमारतींमध्ये अनेक वर्षांपासून भाडेकरू राहत आहेत. त्यात मुंबई सेंट्रल, आग्रीपाडा, माझगाव ताडवाडी येथील बीआयटी चाळींचा समावेश आहे. या इमारतींमधील रहिवाशांनी गेल्या महिन्यात पालिका मुख्यालयात आयुक्त भूषण गगराणी यांची भेट घेतली होती. मालमत्ता आणि सुधार या विभागात काही अधिकारी हे विकासकाला मदत करत असल्याचा आरोप रहिवाशांनी केला होता.

काही सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि या विभागात वर्षानुवर्षे असलेले अधिकारी हे ठराविक विकासकाला मदत करीत असल्याचा आरोप या रहिवाशांनी केला होता. पालिका मुख्यालयात १७ नोव्हेंबर रोजी झालेल्या जन गाऱ्हाणी दिनातही रहिवाशांनी ही तक्रार केली होती. परंतु, त्यावर काहीच कारवाई न झाल्यामुळे आता सात दिवसांत चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश सुधार विभागाचे उपायुक्त संजोग कबरे यांनी मालमत्ता विभागाला दिले आहेत.

मुंबई महापालिकेच्या मालकीच्या इमारती अनेक वर्षे जुन्या असून त्या इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पात ठराविक अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार करून महापालिकेचे कोट्यवधींचे नुकसान केल्याचा आरोपही रहिवाशांनी केला आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते संतोष दौडकर यांच्यासह मुंबई सेंट्रल बीआयटी, माझगाव ताडवाडी बीआयटी अशा चाळीतील रहिवासी जन गाऱ्हाणी दिनी उपस्थित होते.



नवी मुंबई करांच्या मनात असलेले निसर्गरम्य परिसरात सानपाडा येथील आज दिनांक ४ डिसेंबर 2025 रोजी दत्तजयंतीच्या निमित्ताने ' दत्त जन्मोत्सव सोहळा ' अत्यंत भक्ती भावाने साजरा करण्यात येत आहे. सुमारे दोनशे वर्षांपूर्वी चे हे मंदिर सानपाडा गावातील भक्तांनी तीर्थक्षेत्राच्या स्वरूपात विस्तार केल्याने नवी मुंबई , रायगड , ठाणे परिसरातून भक्तांची मोठी गर्दी दर्शनासाठी होत असते. दत्त जयंती उत्सवानिमित अतिशय सुंदर विद्युत रोषणाई सजावट करून मंदिर सजवले जाते. या निमित्ताने मंदिरात चार दिवसांचा अखंड हरिनाम सप्ताह आणि त्यात काकडा, भजन ,आरती ,आणि प्रवचन, यांसारखे कार्यक्रम पाहणे ऐकणे भक्तांसाठी अतिशय सुखद ठरतात . मंदिराच्या परिसरात लहान मुलांपासून तर अगदी मोठ्या व्यक्तींसाठी खेळणी , खाद्य वस्तू , सौंदर्य प्रसाधन अशा वस्तूंची रेलचेल पाहायला मिळते त्यानिमित्ताने वस्तूंची खरेदी विक्री होत असते अशी छोटी जत्राच या ठिकाणी भरते. दत्त महाराजांची विधिवत पूजा सकाळी करून दर्शनासाठी भक्तांना सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत पर्यंत खुले केले जाते. संध्याकाळी सात वाजता पालखी सोहळा उत्सव डोळ्यांचे पारणे फेडणारा असाच असतो. दत्त महाराजांचे अत्यंत भक्तिभावाने दर्शन घेऊन भाविक तृप्त होतात आणि आनंदाने आपल्या घरी जातात.

**( प्रतिनिधी दैनिक युवक आधार ) श्री. उमाकांत पानसरे**

# खेळणा नदीवरील पुलाला 'श्रेय' वादाचा शाप! काम ठप्प, जनता त्रस्त, प्रशासन निद्रेत

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी:- योगेश पालोदकर**



सिल्लोड:- तालुक्यातील पालोद येथील खेळणा नदीवरील अत्यंत महत्त्वाच्या पुलाचे काम कित्येक महिन्यांपासून बंद असल्याने परिसरातील हजारो नागरिक, शाळकरी विद्यार्थी आणि व्यावसायिकांचे अतोनात हाल होत आहेत. पावसाळा संपूनही या पुलाच्या बांधकामाला पुन्हा सुरुवात झालेली नाही, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या गंभीर गैरसोयीकडे स्थानिक प्रशासन जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे, तर दुसरीकडे स्थानिक राजकीय कार्यकर्ते पुलाच्या मूळ समस्येकडे दुर्लक्ष करत, पुलाच्या बाजूला काढलेल्या तात्पुरत्या रस्त्यावरून 'श्रेयवादाचे' राजकारण करण्यात मश्गूल असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

हा पूल परिसरासाठी जीवनवाहिनीसारखा आहे. पुलाचे काम बंद असल्याने शालेय विद्यार्थ्यांना दररोज जीवघेण्या पर्यायी, थातुरमातुर कच्च्या रस्त्यावरून प्रवास करावा लागतो. या रस्त्यामुळे दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे मोठे नुकसान होत आहे, तसेच अपघात होण्याची भीतीही वाढली आहे. 'पावसाळ्यामुळे काम थांबले,' हे कारण आता निष्प्रभ ठरले आहे, कारण महिने उलटले तरी प्रशासकीय यंत्रणेकडून कामाला सुरुवात करण्याचे कोणतेही चिन्ह दिसत नाही.

नागरिक म्हणतात: "प्रशासनाला आमची किंमतच नाही का? कित्येक महिन्यांपासून आमचे हाल होत आहेत. विद्यार्थी शाळेत वेळेवर पोहोचू शकत नाहीत, तर रुग्णवाहिकेलाही वळसा घालून जावे लागते. या निष्काळजीपणाला कोण जबाबदार आहे?"

एकीकडे नागरिक पुलाच्या कामासाठी प्रशासनाकडे वारंवार मागणी करत असताना, दुसरीकडे स्थानिक राजकारण्यांनी अत्यंत संतापजनक भूमिका घेतल्याचे चित्र आहे. पुलाचे मुख्य काम अपूर्ण असताना, राजकारणी मूळ समस्यांवर आवाज न उचलता, पुलाच्या बाजुला तयार केलेल्या 'थातुरमातुर' पर्यायी रस्त्याच्या कामाचे श्रेय घेण्यामध्ये एकमेकांवर कुरघोडी करत आहेत. 'श्रेय' घेण्यासाठी चाललेल्या या 'लढाई'मुळे नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा थेट आरोप होत आहे.

प्रशासनाच्या या 'निद्राधीन' अवस्थेमुळे स्थानिक विकासकामांच्या गुणवत्तेवर आणि वेळेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या गंभीर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून, पुलाचे काम त्वरित सुरू न करणाऱ्या संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# ड्राय-डेची उघड उघड धज्जी!

## नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुका सुरू असताना

## बसस्थानकाजवळ दारूची सर्रास विक्री पोलिस प्रशासनावर प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**

**वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

**मालेगाव, दि. २ डिसेंबर** – नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुका सुरू असल्याने शासनाने मद्यविक्रीवर पूर्ण बंदी घालून सर्व मद्यपान दुकाने बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. निवडणूक आयोगानेही ड्राय-डेचे कठोर पालन करण्याचे निर्देश पोलिसांना दिले असतानाही मालेगावात त्याची उघडपणे पायमल्ली होताना दिसली.




मालेगाव बसस्थानकाच्या पाठीमागील देशी दारू दुकानासमोर २ डिसेंबर २०२५ रोजी दारूची खुलेआम व जोरात विक्री सुरू असल्याचे प्रत्यक्ष पाहण्यात आले.निवडणुकीच्या संवेदनशील काळात शासनाच्या जीआरला धाब्यावर बसवत सुरू असलेली ही विक्री पोलिस प्रशासनाच्या नाकावर टिचून होत असल्याचे नागरिकांचे तीव्र मत आहे.ड्राय-डे असूनही दुकानासमोर मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री, परिसरातील वर्दळ, ग्राहकांची ये-जा — या सर्व गोष्टींमुळे मालेगाव पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

बसस्थानक परिसर हा गर्दीचा व संवेदनशील भाग असून येथे दारू विक्री सुरू असल्याने महिलांना, प्रवाशांना व विद्यार्थ्यांना असुरक्षित वातावरणाचा सामना करावा लागत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.नशेत असलेले काही जण बसस्थानक परिसरात गोंधळ घालत असल्याचे प्रकारही पूर्वी घडले आहेत.

**स्थानिकांचा सवाल:**

नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक काळातील ड्राय-डेची अंमलबजावणी केवळ कागदावरच?

संबंधित दुकानांवर आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्यांवर कारवाई कुठे?पोलिस प्रशासन इतके निष्क्रिय का?नागरिकांनी तातडीने कठोर कारवाईची मागणी केली असून निवडणूक काळातील दारू विक्री थांबवून जबाबदारांवर दंडात्मक कारवाई करावी,अशी जोरदार मागणी होत आहे. मालेगावातील हा प्रकार शासनाच्या आदेशांची उघड पायमल्ली आणि पोलिसांच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरत आहे.

# वीर वाजेकर महाविद्यालयात मेडिकल लॅबोरेटरी टेक्निक (CMLT) अभ्यासक्रमाचे उद्घाटन

दैनिक युवक आधार कॉलेज कट्टा/आरती सुरवसे




रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागात मेडिकल लॅबोरेटरी टेक्निक (CMLT) या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या अभ्यासक्रमाचे उद्घाटन जेएनपीए हॉस्पिटल, न्हावा शेवा येथील डॉ. वर्षा यादव यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाचे आयोजन कार्यवाह प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य श्री. गजानन चव्हाण होते, तर समन्वयनाची जबाबदारी आयक्यूएसी समन्वयक डॉ. राहुल पाटील यांनी सांभाळली.

या अभ्यासक्रमासाठी बी.एस्सी. विद्यार्थ्यांनी उत्साहाने प्रवेश घेतला आहे. CMLT अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेतील मूलभूत तंत्रज्ञान, तसेच पॅथॉलॉजी प्रयोगशाळेत वापरल्या जाणाऱ्या विविध उपकरणांचे प्रत्यक्ष हाताळणीचे कौशल्य शिकविण्यावर आधारित आहे. या अभ्यासक्रमाच्या समन्वयक डॉ. श्रेया पाटील आहेत. उद्घाटन प्रसंगी असेही जाहीर करण्यात आले की, अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमात प्रवेश घेऊन त्याचा लाभ घ्यावा, कारण हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या कौशल्यवृद्धी आणि रोजगाराभिमुखतेसाठी उपयुक्त ठरणार आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवीवर्षनिमित्त आंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा




**दैनिक युवक आधार पनवेल (प्रतिनिधी)**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवीवर्षनिमित्त चांगु काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (अधिकारप्रदत्त स्वायत्त) अर्थात सीकेटी महाविद्यालयाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक संजय भगत व चांगु काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के. पाटील यांच्या हस्ते आज (दि.४) करण्यात आले.


या स्पर्धेमध्ये ११० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला आहे. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही. बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नात्ती, प्रा. भरत जितेकर व प्रा. प्रतिज्ञा पाटील जिमखाना विभागाचे सर्व सदस्य विशेष परिश्रम घेत आहेत.

## देवगावात बिबट्यांचा धुमाकूळ!
### महिनाभरात तिसरा बिबट्या जेरबंद

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**
**देवगाव**

:- निफाड तालुक्यातील देवगाव परिसरात बिबट्यांचा वाढता वावर पुन्हा एकदा समोर आला आहे. आज (४ डिसेंबर) पहाटे आणखी एक बिबट्या पिंजऱ्यात कैद झाला असून, गेल्या महिनाभरात पकडला गेलेला हा तिसरा बिबट्या ठरला आहे. उसाच्या शेतांमध्ये वाढलेल्या वावरामुळे देवगाव परिसर बिबट्या-प्रवण क्षेत्र बनत चालला आहे.

गट क्रमांक ४१४/२ मधील पोलिस पाटील सुनील बोचरे यांच्या शेताजवळ लावलेल्या पिंजऱ्यात साधारण पाच वर्षांचा नर बिबट्या अडकलेला आढळला. माहिती मिळताच वनरक्षक विंचूर विजय दोंदे, माजी सैनिक अंकुश गुंड, आधुनिक बचाव पथक निफाडचे सागर दुसिंग, भारत माळी, विजय माळी, सादिक शेख, वैभव दौंड, शरद चांदोरे, मयुर गांगुर्डे, समाधान चव्हाण यांनी घटनास्थळी धाव घेत बिबट्याला सुरक्षित ताब्यात घेतले. दरम्यान, पिंजऱ्यालगत आणखी एक बिबट्या बसून असल्याचे शेतकऱ्यांनी पाहिल्याचे सांगितले. मात्र ग्रामस्थांची गर्दी वाढताच तो बिबट्या जवळच्या उसाच्या शेतात पसार झाला. त्यामुळे परिसरातील भीतीचे वातावरण आणखी गंभीर झाले आहे. सध्या देवगाव, रुई, धानोरे, कानळद, शिरवाडे वाकद, देवगाव फाटा, वाकद, मानोरी या भागात बिबट्यांच्या सततच्या हालचाली सुरूच आहेत. शेतात, रस्त्यावर तसेच शाळा परिसरातही बिबट्याचे दर्शन होत असल्याने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती, शेतकरी वर्गाची कामे आणि रात्रीची हालचाल यावर मोठा परिणाम होत आहे.



# "अड्याळ येथे दिव्यांग व्यक्ति दिवस व स्त्री हिंसा विरोधी पंधरवाडा साजरा"

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

भंडारा --पवनी तालुक्यातील अड्याळ येथे दिव्यांग व्यक्ती दिवस व स्त्री हिंसा विरोधी पंधरवाडा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्था ही 1984 पासून कार्यरत असून मागील दोन दशकापासून दिव्यांग व्यक्तींच्या संशक्तीकरणासाठी तत्परतेने काम करीत आहे, दिव्यांग व्यक्तींचे समुदाय आधारित पुनर्वसन या प्रकल्पअंतर्गत संस्थेच्या मार्गदर्शनातून स्थापन झालेल्या समता दिव्यांग संघटना, अड्याळ दिव्यांग दिनाचे औचित्य साधून दि. ०3 डिसेंबर २०२५ रोजी मंडई पेठ समाज भवन, अड्याळ येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

"०३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिन" या वर्षाची जागतिक स्तरावर संकल्पना हि 'सामाजिक प्रगतीसाठी दिव्यांगत्व समावेशक समाजांना प्रोत्साहन देणे' या संकल्पनेला ला लक्षात घेऊन साजरा करून दिव्यांगां प्रती समाजात जाणीव जागृती व्हावी, दिव्यांग व्यक्तिचे नेतृत्व वाढविणे, समाजात सर्वसमावेशक वातावरण निर्माण व्हावे, अधिकार व हक्क याला घेऊन माहिती व्हावी सोबतच दिव्यांग व्यक्तीवर, महिलांवर होणारी हिंसा याला घेऊन दिव्यांग व्यक्ति जागृत व्हावे या उद्देशाने "३डिसेंबर जागतिक दिव्यांग दिन" आणि "जागतिक स्त्री हिंसा विरोधी पंधरवाडा अभियान" तसेच जिल्हा दिव्यांग पुनर्वसन तर्फे मार्गदर्शन शिबीर चे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलनाने व प्रतिमांना पुष्पार्पणाने केली गेली. कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून लाभलेले पवनी तालुका पंचायत समिती सदस्य सीमा गिरी , अड्याळ ग्रामपंचायतचे सरपंच शिवशंकर मुंगाटे, ग्रामसेविका पौर्णिमा साखरे , महिला संघटने सोबत सक्रिय काम करणाऱ्या समाज सेविका तारा कुंभलकर, दिव्यांग पुनर्वसन केंद्र येथील समन्वयक बांते आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लाभलेले आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्थेचे संस्थापक डॉ. सतीश गोगुलवार उपस्थित होते.

सर्व उपस्थितांना दिव्यांग दिनाच्या शुभेच्छा देत या कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने तसेच लाखांदूर तालुक्यातील चुडाराम ठाकरे भाऊ आणि अशोक पिल्लेवार भाऊ हे दिव्यांग असून यांनी आज दिव्यांग दिना निमित्त गायन, पेटी वादन कला सादर केली व कार्यक्रमाची शोभा वाढवली. त्यानंतर मार्गदर्शनाला सुरुवात करण्यात आली सर्वप्रथम सरपंच साहेब शिवशंकर मुनगाटे यांनी दिव्यांगांशी संवाद साधत दिव्यांग बांधवांनी एकत्रित येऊन आपल्या हक्का विषयी जागरूक राहून शासकीय योजना विषयक माहिती दिली. त्यानंतर ग्रामसेविका पौर्णिमा साखरे मॅडम यांनी सुद्धा दिव्यांगाना प्रेरित करीत उपस्थितांशी संवाद साधला.

जागतिक स्त्री हिंसा विरोधी पंधरवाडा ची २०२५ या वर्षाची जागतिक स्तरावर संकल्पना हि "सर्व महिला आणि मुलींविरुद्ध डिजिटल हिंसाचार संपविण्यासाठी संयुक्त प्रयत्न" याला लक्षात घेऊन तारा कुंभलकर व सीमा गिरी मॅडम यांनी संवाद साधला, त्याच बरोबर दिव्यांग पुनर्वसन भंडारा येथून बांते यांनी दिव्यांगांना मिळणाऱ्या विविध




योजनांन विषयी माहिती दिली व त्यांचा प्रश्नांचे निराकरण केले.

जागतिक दिव्यांग दिनाचे महत्व काय आहे? या विषयी सुजाता कन्या विद्यालयातील सोनाली तलमले हिने यावर भाष्य केले. संस्थेच्या कार्याविषयी व उद्दिष्टांबाबत डॉ. सतीश गोगुलवार सर यांनी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर समाज आधारित दिव्यांग पुनर्वसन प्रकल्पांतर्गत राबविल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी उपस्थित दिव्यांग बांधवांना संघटनेच्या माध्यमातून येणाऱ्या अडचणींवर मात करण्याचे आवाहन केले असून मार्गदर्शकांनी दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या योजना, कायदे, अधिकार यावर चर्चा केली. अडयाळ येथे आयोजित जागतिक दिव्यांग दिन व स्त्री हिंसा विरोधी पंधरवाडा कार्यक्रमाला दिव्यांग व्यक्तींचा उत्फुर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे नियोजन, सूत्रसंचालन व प्रस्ताविका निधी धुर्वे, छाया तलमलें आणि समता दिव्यांग संघटना चे अध्यक्ष रुपेश तलमले यांनी केले, तर आभार प्रदर्शन देवचंद बेलखोडे यांनी केले.

# गुडघा व नितंब प्रत्यारोप शस्त्रक्रिया शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**रिसोड, प्रतिनिधी..**
**रणजीतसिह. ठाकुर**

दि. २ डिसेंबर ममता आणि मधुसुदन अग्रवाल फाउंडेशन, मुंबई तसेच संजीवनी ममता हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने 23 ते 30 नोव्हेंबर दरम्यान झालेल्या मोफत मेगा गुडघा व नितंब (Knee & Hip) प्रत्यारोप शस्त्रक्रिया शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात एकूण 2334 रुग्णांची तपासणी झाली यापैकी 1493 रुग्णांचे एक्स-रे काढले व त्यामधून 441 रुग्न हे शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले असून या रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी तयारी असता त्यांची 31 मार्चपूर्वी मोफत शस्त्र करण्याचे उद्दिष्ट आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात गुडघा व नितंब शिबिराचे आयोजन हा एक विक्रम असून याची दखल गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड या संस्थेने घेतली असून यापूर्वी 24 तासांमध्ये 250 हिप व नी रुग्णांच्या तपासणीचा विक्रम होता. ममता आणि मधुसूदन फाउंडेशन तर्फे 27 नोव्हेंबर ला दुपारी एक ते 28 नोव्हेंबर दुपारी एक पर्यंत या 24 तासात 512 रुग्णांची तपासणी करण्यात आली हा एक विक्रम असून याची अधिकृत घोषणा होणे बाकी आहे. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड या संस्थेते तर्फे लवकरच अधिकृत घोषणा होणार असल्याचे कळते.

फाउंडेशनचे अध्यक्ष मधुसुदनजी अग्रवाल यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम म्हणून हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. समता सर्वस्व आरोग्य सेवा केंद्र येथे संपन्न झालेल्या शिबिरात विदर्भ,मराठवाडा व




खानदेश परिसरातील गुडघा व नितंब समस्यांनी त्रस्त असलेले रुग्ण मोठ्या संख्येने आले होते. रुग्णांसाठी हे शिबिर वरदान ठरले असून रुग्णांची शस्त्रक्रिया संजीवनी ममता हॉस्पिटल मुंबई येथे पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहे.

शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची प्रगत तपासणी करण्यात आली. रुग्णांना अत्याधुनिक मॉडेल एक्स-रे, आवश्यक वैद्यकीय तपासण्या तसेच तज्ज्ञ डॉक्टरांचे सल्लामसलत सत्र व

वैज्ञानिक पद्धतीने तपासणी तसेच तज्ज्ञांचे मार्गदर्शन करण्यात आले.

या शिबिरात जगप्रसिद्ध गुडघा प्रत्यारोपण शल्यविशारद व 28000 हून अधिक गुडघा-नितंब प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केलेले डॉ. नारायण खंडेलवाल तसेच प्रसिद्ध ऑर्थोपेडिक विशेषज्ञ डॉ. शारिक अन्सारी शिबिरामध्ये उपस्थित होते.

शिबीर यशस्वी होण्यासाठी डॉ अक्षय देशमुख, डॉ मुकुंद व्यवहारे, डॉ अजय नाईकवाडे, डॉ पंकज वाघ, डॉ सागर ठाकूर, डॉ गजानन बगडिया, डॉ प्रशांत आटोळे, डॉ गिरीश बगडिया यांनी सहकार्य केले. शिबिराची कोऑर्डिनेटर म्हणून डॉ.अजय पाटील शिबिरात पूर्ण वेळ उपस्थित होते. संजीवनी ममता हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर चे सर्व डॉक्टर्स व कर्मचारी, शिबिर समन्वयक दिपेन शर्मा डॉ काटोले, संतअमरदास अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटीचे रिसोड शाखा अध्यक्ष मनीष बगडिया, सर्व कर्मचारी, उत्तमचंद बगडिया कला व वाणिज्य महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी व विद्यार्थी स्थानिक कोर कमिटीचे सदस्य उत्तमचंदजी बगडिया, संजय उकळकर,संतोष वाघमारे शहरातील प्रतिष्ठित डॉक्टर्स यांनी अथक परिश्रम घेतले. शिबिरास ममता आणि मधूनसुदन अग्रवाल फाउंडेशनचे अध्यक्ष मधुसूदन अग्रवाल व ममता मधूसुदन अग्रवाल यांनी भेटी दिल्या. सतत गुडघेदुखी किंवा नितंबदुखी चालणे, बसणे, जिने चढणे यात त्रास,सांध्यांमध्ये सूज, कडकपणा औषधोपचारांनी आराम न मिळणे जीवनमानावर परिणाम करणारी वेदना अशा रुग्णांची तपासणी करण्यात आली "समाजसेवेच्या माध्यमातून गरजू रुग्णांना नवीन आयुष्य देण्याचा आमचा प्रयत्न आहे. आर्थिक परिस्थिती संसाधनांअभावी अनेक रुग्णांना शस्त्रक्रिया करता येत नाही; अशांना मदत करण्याचा हा उपक्रम असून महाराष्ट्रात प्रथमताप्रथमता 11 जिल्ह्यांमध्ये गुडघा व नितंब प्रत्यारोप शस्त्रक्रिया उपक्रम राबविणार असून या जिल्ह्यातील गरजू रुग्णांना फाउंडेशनच्या मार्फत मोफत शस्त्रक्रिया करून देणार आहे. संपूर्ण महाराष्ट्र गुडघा व नितंब शस्त्रक्रिया मुक्त करण्याचा करण्याचा मानस असून या शिबिरात एवढ्या मोठ्या प्रमाणात रुग्णांनी याचा लाभ घेतला याचे समाधान आहे असे मत ममताआणि मधुसूदन अग्रवाल फाउंडेशनचे अध्यक्ष श्री मधुसूदन भाईसाहब यांनी व्यक्त केले.

**Best Opportunity For**

- House Wife
- Retired
- Teacher
- Businessman



- We are fastest growing organization
- Work Fulltime or Part time as per your requirement
- No Target, No Investment
- Reward & Recognition
- Opportunity For Domestic & International Trip

Hurry Up Limited Seats

Provident Fund + Medical Benefits
Education: 12th pass to Graduates
Entry Age: 30 years to 65 years

Earn Fixed salary upto Rs.30,000/- & incentives upto 2 lakhs p.m.

Gauri gaikwad:8898632067

# शुक्रवारपासून पनवेलमध्ये 12 व्या राज्यस्तरीय 'अटल करंडक' एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी

**राज्यातून निवडलेल्या २५ उत्कृष्ट एकांकिका होणार सादर नाट्य सिने क्षेत्रातील अनेक मान्यवरांची लाभणार मांदियाळी**

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी प्रमाणे यंदाही राज्यस्तरीय 'अटल करंडक' एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने या १२ व्या स्पर्धेची महाअंतिम फेरी दिनांक ०५, ०६ आणि ०७ डिसेंबर रोजी पनवेलमधील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. या स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला ०१ लाख रूपये आणि मानाचा 'अटल करंडक' देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार तसेच ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी आणि सुप्रसिद्ध अभिनेते व निर्माता सुनिल बर्वे यांचा "गौरव रंगभूमीचा" पुरस्काराने




सन्मान करण्यात येणार असून राज्यभरातून निवड झालेल्या उत्कृष्ट २५ एकांकिका या तीन दिवसांच्या महाअंतिम फेरीत सादर होणार आहेत.

या महाअंतिम फेरी सोहळ्याचे उदघाटन शुक्रवार दिनांक ०५ डिसेंबरला सकाळी ०९ वाजता पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध नाट्य निर्माता कल्पना कोठारी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, राजू सोनी, तेजस कांडपिळे, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा रुचिता लोंढे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुरेखा मोहोकर, प्रीती जॉर्ज यांची उपस्थिती असणार आहे.

तर पारितोषिक वितरण समारंभ रविवार दिनांक ०७ डिसेंबर रोजी सायंकाळी ०४ वाजता माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यावेळी "गौरव रंगभूमीचा" पुरस्काराचे मानकरी ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी व सुनील बर्वे, तसेच सन्माननीय उपस्थिती म्हणून माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध अभिनेते गिरीश ओक, सुप्रसिद्ध दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, सुप्रसिद्ध अभिनेते सुनील तावडे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबई प्रमुख कार्यवाह अजित भुरे, सुप्रसिद्ध अभिनेता जयवंत वाडकर, भरत सावले, सुप्रसिद्ध नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, अटल करंडक ब्रँड अँम्बेसिडर सुप्रसिद्ध अभिनेते सुव्रत जोशी, अभिनेते व दिग्दर्शक प्रमोद शेलार, प्रमोद अत्रे यांची तसेच भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली मंडल अध्यक्ष अमर पाटील, कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत, उत्तर मंडल अध्यक्ष दिनेश खानावकर, नवीन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, दक्षिण मंडल अध्यक्ष मंगेश वाकडीकर आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे. त्याचबरोबर या दिवशी प्रसिद्ध मराठी अभिनेते, दिग्दर्शक पुष्कर श्रोत्री त्यांच्या खास शैलीत बहारदार सूत्रसंचालन करणार आहेत. तसेच बक्षिस वितरण सोहळ्याच्या दिवशी हास्यजत्रा फेम अरुण कदम, श्याम राजपूत व चेतना भट त्याचबरोबर हास्य सम्राट विजेते प्रा. दीपक देशपांडे यांचा मनोरंजनात्मक कार्यक्रम होणार आहे. या महाअंतिम फेरीच्या अनुषंगाने नाट्य एकांकिकांचा रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर, अटल करंडक आयोजन कमिटीचे उपाध्यक्ष विलास कोठारी, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील आणि टीम अटल करंडक यांनी केले आहे.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.


daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# भारतीय राजकारणातील हिंदुत्वाचा पहिला खराखुरा चेहरा : डॉ. रमेश प्रभू !

**-योगेश वसंत त्रिवेदी, 9892935321***

सध्याच्या राजकीय वातावरणात हिंदुत्वाचा टेंभा मिरविण्याचे किळसवाणे प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरु आहेत. दर्ग्यावर चादरी चढवून आणि ईद मिलनाच्या कार्यक्रमात सीर कुर्मा ओरपणारे हिंदुत्वाचा डांगोरा पिटत असल्याचेही दिसून येते. अशा परिस्थितीत भारतीय राजकारणातील हिंदुत्वाचा खराखुरा चेहरा म्हणून मुंबईचे माजी महापौर डॉ. रमेश यशवंत प्रभू यांचे नांव प्रकर्षाने घ्यावे लागेल. हा 'विनोद' नव्हे तर हीच 'वस्तुस्थिती' आहे. डॉ. रमेश प्रभु हे नाव हिंदुत्वाशी संपूर्ण देशात जोडले गेले ते त्यांनी १९८७ साली लढविलेल्या मुंबईतील विलेपार्ले मतदारसंघातील पोट निवडणुकीमुळे. ही देशातील पहिली निवडणूक थेट हिंदुत्वाच्या मुद्द्यावर लढविण्यात आली होती. लोकप्रतिनिधी कायदा १९५२ अन्वये हिंदुत्वाच्या आधारावर मते मागितल्यामुळे ही निवडणूक मुंबई उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविली आणि या निर्णयावर पुढे सर्वोच्च न्यायालयानेही शिक्कामोर्तब केले. निवडणूक रद्दबातल ठरली तरी थेट हिंदुत्वाच्या मुद्यावर मते मागता येतात व मतदारांचे ध्रुवीकरण करता येते, हे या निवडणुकीने सिद्ध झाले. या निवडणुकीमुळे हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांचा मतदानाचा अधिकार सहा वर्षांसाठी काढून घेण्यात आला. तर दुसरीकडे याच निवडणुकीमुळे भारतीय जनता पक्षाला महाराष्ट्रात पाय रोवण्यासाठी शिवसेना नावाचा नवा खंदा राजकीय सहकारी मिळाला. या निवडणुकीने डॉ. रमेश प्रभू यांचे नाव संपूर्ण देशभरात गाजले.

१९८७ साली काँग्रेसचे विलेपार्ले येथील आमदार हंसराज भुग्रा यांचे निधन झाले. भुग्रा यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या या मतदारसंघात पोट निवडणूक लागली. या निवडणुकीत काँग्रेसतर्फे बडे नेते प्रभाकर कुंटे यांना उमेदवारी देण्यात आली. कुंटे यांचे नाव राज्याच्या राजकारणात प्रचंड दबदबा असणारे होते. समाजवादी पार्श्वभूमीच्या कुंटे यांनी मुंबईतील झोपडपट्टीच्या केलेल्या सर्वेक्षणातून मुंबईतील झोपडीधारकांना फोटोपास मिळाले होते. काँग्रेस अंतर्गत राजकारणातही कुंटे यांचा मोठा दबदबा होता. राज्याच्या मुख्यमंत्रीपदावर शंकरराव चव्हाण यांच्यासारखे करड्या शिस्तीचे नेते होते. बॅरिस्टर अब्दुल रहेमान अंतुले यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळातील शिवसेना आणि काँग्रेसचे मधूर संबंध संपुष्टात आले होते. बाळासाहेब ठाकरे यांनी काँग्रेसच्या विरोधात थेट भूमिका घेतली होती. विलेपार्ले येथील या पोट निवडणुकीसाठी त्यांनी मुंबईचे महापौर असलेल्या डॉ. रमेश प्रभू यांची निवड केली आणि निवडणूक घोषणा दिली, 'गर्व से कहो हम हिंदू है'. आज हिंदुत्वाच्या नावावर देशाची सत्ता काबीज करणाऱ्या भारतीय जनता पार्टीचा ६ एप्रिल १९८० रोजी जन्म झाला होता. मात्र भाजपने शिवसेनेला १९८७ च्या पोटनिवडणुकीत पाठिंबा दिला नव्हता. तर भाजपचा पाठिंबा जनता पक्षाला होता. जनता पक्षाचे प्राणलाल व्होरा, काँग्रेसचे प्रभाकर कुंटे आणि शिवसेनेचे डॉ. रमेश प्रभू अशी ही तिरंगी लढत होती. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांनी परळच्या प्रिन्सिपॉल वामनराव महाडिक यांच्या पोट निवडणुकीप्रमाणेच या निवडणूक प्रचाराची व्यूहरचना आखली होती. संपूर्ण मुंबईतील शिवसैनिकांना प्रचारासाठी विलेपार्ल्यात उतरविण्यात आले होते. संपूर्ण विले पार्ले अक्षरशः भगव्या रंगाने न्हाऊन निघाले होते. बाळासाहेब ठाकरे आणि रमेश प्रभू या दोघांनीही थेट हिंदुत्वाच्या मुद्यावर जाहीर सभांमधून मते मागितली होती. भाजपचा जनता पक्षाला पाठिंबा असला तरी विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते या निवडणुकीत शिवसेनेचे डॉ रमेश प्रभू यांचा झंझावाती प्रचार करीत होते. या सगळ्या झंझावातामुळे प्रभू यांनी निवडणूक जिंकली.




या निवडणुकीमुळे भाजपचे निवडणूक चाणक्य म्हणून ओळखण्यात येणाऱ्या प्रमोद व्यंकटेश महाजन यांना पहिल्यांदाच शिवसेनेचा अंदाज आला व शिवसेना भाजप युतीच्या दिशेने राजकारण सुरू झाले. या पोट निवडणुकीच्या निकालानंतर डॉ. रमेश प्रभू यांच्या विरोधात प्रभाकर कुंटे यांनी उच्च न्यायालयात निवडणूक याचिका दाखल केली. लोकप्रतिनिधी कायद्यान्वये ही याचिका होती. कुंटे यांच्या बाजूने ॲडवोकेट मनुभाई वशी यांनी बाजू मांडली. तर प्रभू यांच्या वतीने प्रख्यात कायदेतज्ज्ञ अधिक शिरोडकर व राम जेठमलानी यांनी बाजू मांडली. पुढे या कायद्यान्वये धर्माच्या नावावर मते मागणे किंवा दुसऱ्या उमेदवाराला मते देऊ नका, असे सांगणे हे अयोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आणि न्यायालयाने कुंटे यांची बाजू उचलून धरतांना प्रभू यांची निवडणूक रद्दबातल केली या शिवाय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांचा धर्माच्या नावावर मते मागितल्याने मतदानाचा अधिकार काढून घेण्यात आला.

या निवडणुकीमुळे भाजपने शिवसेनेबरोबर युती तर केलीच शिवाय निवडणुकीच्या राजकारणात आक्रमक हिंदुत्वाचा प्रचार स्वतःच्या मंचावरून करण्याचे न्यायालयाच्या निकालामुळे त्यांनी कायम टाळले. साध्वी ऋतंभरा किंवा तत्सम आक्रमक हिंदुत्वाची भाषा करणाऱ्यांना प्रचारात हिंदुत्वाचा प्रचार करण्याची जबाबदारी देऊन त्यांना भाजपच्या मंचावर नेण्याचे टाळत मतांचे ध्रुवीकरण करण्याची रणनिती आखण्यात आली.

दुसरीकडे डॉ. रमेश प्रभू यांनाही पुढे सहा वर्षे निवडणूक लढविण्यावर बंदी आली. शिवसेनेच्या राजकारणातही प्रभू मागे पडत गेले. २००४च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी शिवसेनेकडे विलेपार्ले येथून मागितलेली उमेदवारी त्यांना नाकारण्यात आल्यावर प्रभू यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविली. त्यातून शिवसेनेचा अधिकृत उमेदवार पराभूत झाला. तरीही त्यांनी शिवसेनेला पाठिंबा देण्याची भूमिका घेतली होती. कालांतराने डॉ रमेश प्रभू यांनी शिवसेनेला सोडचिठ्ठी दिली आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही त्यांचे फारसे मन रमले नाही. पुढे ते महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमध्ये सामील झाले. मात्र राजकारणात त्यांचे मन रमले नाही. त्यांनी क्रीडा, सामाजिक कार्य यातच अधिकाधिक वेळ आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात दिला.

□मुंबई उपनगराला ऐतिहासिक आणि अभूतपूर्व देणगी !

डॉ. रमेश प्रभू यांचा मूलतः पिंड हा सामाजिक सेवेचा. नव्या पिढीला ऐतिहासिक प्रेरणा मिळावी यासाठी डॉ. रमेश प्रभू यांनी जुहू येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य दिव्य स्मारक उभे केले आहे. त्या ठिकाणी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात. विलेपार्ले येथे डॉ. रमेश प्रभू यांनी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांचे पिताश्री, संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील अग्रणी, थोर समाजसुधारक केशव सीताराम ठाकरे ऊर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या नावाने भव्य क्रीडा संकुल उभारले. या संकुलाच्या माध्यमातून सुदृढ, सशक्त खेळाडू तयार व्हावेत आणि आपल्या महाराष्ट्राचे, पर्यायाने हिंदुस्थानचे नांव आंतरराष्ट्रीय पातळीवर उंचावेल, असा उद्देश डॉ. रमेश प्रभू यांनी आपल्या डोळ्यासमोर ठेवून या संकुलाची उभारणी केली. या ठिकाणी सर्वात मोठा जलतरण तलाव सुद्धा उभारण्यात आला. आजमितीला हे संकुल डॉ रमेश प्रभू यांचे सुपुत्र अरविंद यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली कार्यरत असून त्याचा व्यापही वाढला आहे. दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी डॉ. रमेश प्रभू यांनी अथक परिश्रम घेतले आहेत. संयमी, शांत स्वभावाचे डॉ रमेश प्रभू हे भारतीय राजकारणातील संसंस्कृत व्यक्तिमत्त्व म्हणावे लागेल. स्थापनेच्या वेळी राडा संस्कृती म्हणून ओळखण्यात येणाऱ्या शिवसेनेत प्रिन्सिपॉल वामनराव महाडिक यांच्या नंतर मनोहर जोशी, प्रमोद नवलकर, सुधीर जोशी यांच्या बरोबरीने डॉ. रमेश प्रभूंचे नांव सुसंस्कृत, अभ्यासू नेते म्हणून घ्यावे लागेल. ऐंशीच्या दशकात मुंबई महापालिका निवडणुकीत बशीर पटेल हे मुस्लिम लीगचे उमेदवार म्हणून उभे होते. त्यांच्या विरोधात शिवसेनेचे सत्यवान जावकर यांनी निवडणूक लढविली होती. या निवडणुकीनंतर न्यायालयात बशीर पटेल यांच्या विरोधात याचिका दाखल करतांना मुस्लिम धर्माच्या नावावर निवडणूक लढविल्याबद्दल आक्षेप घेण्यात आला होता. ही याचिका सुनावणीसाठी अद्यापही आलेली नाही. त्यानंतर १९८७ च्या विलेपार्ले पोटनिवडणुकीत शिवसेना आणि १९९० च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत शिवसेना भाजप युतीच्या उमेदवारांविरोधात निवडणूक याचिका दाखल करण्यात आल्या. डॉ. रमेश प्रभू यांना धर्माच्या नावावर निवडणूक लढविल्याबद्दल दोषी धरण्यात आले तसेच १९९० च्या निवडणूक याचिकांमध्ये डॉ. मनोहर गजानन जोशी यांच्या समवेत अनेक आमदारांना विधानसभा सदस्यत्व गमवावे लागले. ११ डिसेंबर १९९५ रोजी सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती जे. एस. वर्मा यांनी डॉ. मनोहर गजानन जोशी यांना निर्दोष मुक्त करतांना हिंदुत्वाच्या नावावर निवडणूक लढविणे हा निवडणूक भ्रष्टाचार नाही अथवा गैर नाही, असे शिक्कामोर्तब केले. कर्मधर्मसंयोगाने १९९० च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांच्या गिरगांव चौपाटीवरील सभेतील "महाराष्ट्रात राहतो तो मराठी, गुजरात मध्ये राहतो तो गुजराती, बंगाल मध्ये राहतो तो बंगाली या न्यायाने हिंदुस्थानात राहतो तो हिंदु. आमचे हिंदुत्व हे शेंडी जानव्याचे हिंदुत्व नाही, आमचे हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आहे" ही हिंदुत्वाची व्याख्या मुंबई उच्च न्यायालयात न्या. सॅम वरियावा यांच्या न्यायालयात डॉ. मनोहर जोशी यांच्या खटल्यात माझ्या मुखातून पटलावर आली. मनोहर जोशी यांचे वकील जय चिनॉय यांनी शिताफीने ही व्याख्या माझ्या तोंडून काढून घेतली. हीच व्याख्या सर्वोच्च न्यायालयाने मान्य करीत मनोहर जोशी यांना दोषमुक्त केले. हा इतिहास या अनुषंगाने उद्धृत केला तर ते अनाठायी ठरणार नाही. एकंदरीत डॉ. मनोहर गजानन जोशी हे हिंदुत्वाचा खटला जिंकले तरी भारतीय राजकारणातील हिंदुत्वाचा पहिला खराखुरा चेहरा म्हणून डॉ. रमेश यशवंत प्रभू यांच्या नावाचीच नोंद राजकीय इतिहासात करावी लागेल. डॉ . रमेश प्रभू हे माजी राज्यपाल गणपतराव तपासे यांचे जावई होत. गणपतराव तपासे यांच्या सुकन्या डॉ. पुष्पा याही डॉक्टर होत्या तसेच डॉ रमेश प्रभू यांच्या प्रमाणेच क्रीडा प्रेमी होत्या. प्रभू दांपत्यांनी समाजसेवेचे प्रचंड मोठे जाळे निर्माण केले, ज्याचा उपयोग समाजातील सर्वच वर्गातील होतकरुंनी करुन घेतला. प्रभूंच्या मुलांवरही हेच संस्कार झाले ज्याचा आजही समाजाला यथायोग्य उपयोग होत आहे. आजमितीला डॉ. रमेश प्रभू यांचे चिरंजीव अरविंद आणि सुकन्या लीना हे डॉ रमेश प्रभू यांचा वारसा पुढे चालवीत आहेत. डॉ. पुष्पा रमेश प्रभू या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते महेश तपासे यांच्या आत्या असून तपासे आणि प्रभू परिवाराने सामाजिक बांधिलकी मानून कार्य केले आहे, करीत आहेत. डॉ. रमेश प्रभू आणि डॉ. पुष्पा रमेश प्रभू यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन !

*-योगेश वसंत त्रिवेदी, 9892935321(लेखक ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत)*

## कालिकादेवी विद्यालयात मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार प्रतिनिधी**

कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.) जि.बीड येथे जिल्ह्याचे लोकप्रिय नेते तथा माजी मंत्री मा.जयदत्त(अण्णा)क्षीरसागर साहेब यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त विद्यालयात,"प्रश्नमंजुषा स्पर्धा,निबंध स्पर्धा,सामान्यज्ञान स्पर्धा,कथाकथन स्पर्धा,आणि हस्ताक्षर स्पर्धा"अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.दि.०२/१२/२०२५ मंगळवार रोजी,विद्यालयाचे मुख्याद्यापक तथा प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या हस्ते 'स्व.काकू व नानां' यांच्या प्रतिमांचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य केशव भांगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की,"लोकनेते मा.जयदत्त अण्णासाहेबांचे सामाजिक,शैक्षणिक,राजकीय,आणि सहकार क्षेत्रातील योगदान आपल्याला



विसरता येणार नाही.त्यांनी केलेल्या कार्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्वच समाजातील हुशार,गरिब होतकरू,गरजवंतांना आणि बेरोजगारांना नोकरी,रोजगार उपलब्ध झाला आहे. मा.अण्णांसाहेबांच्या वाढदिवसानिमित्त होत असलेल्या या स्पर्धांमुळे,विद्यार्थ्यांना विविध विषयाचं ज्ञान आकलन व्हावं. त्यांच्या सामान्यज्ञानात भर पडावी,आणि त्यांच्या उपजत गुणांना व्यक्त होण्यासाठी विचारपीठ मिळावे' या उद्देशाने प्रस्तुत स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. असा मनोदय त्यांनी व्यक्त केला. त्यांतर "प्रश्नमंजुषा स्पर्धा" घेण्यात आली.ही स्पर्धा दोन गटात घेण्यात आली.लहान गटात, इ.५ वी ते ७ वी वर्गातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.स्पर्धेचे विजेतेपद इ.७ वी तील कु.गायत्री गायके कु.तन्वी भोसले चि.अतुल इंगळे चि.प्रथमेश वारे या विद्यार्थ्यांनी पटकावले.तर मोठ्या गटात इ.८ वी ते १० वी.वर्गातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये इ.८ वी वर्गातील कु.श्रावणी आघाव,कु.पद्मजा विघ्ने,चि.आशय बडे,चि. ध्रुव मंगरूळकर या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला.स्पर्धेत जिंकलेल्या विद्यार्थ्यांचं अभिनंदन करण्यात आले.यावेळी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे,विज्ञान प्रमुख प्रा.संजय काकडे,सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. आत्माराम झिंजुर्डे,परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे,स्पर्धा प्रमुख सौ.अनिता लाटे,प्रशांत राऊत,बाळासाहेब येवले,निवेदक जयेंद्र निकम,परीक्षक आप्पासाहेब कांबळे, नितीन बहिर तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक,क. प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी,व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

## हुडहुडी भरली! पारा घसरला, गल्लोगल्ली पेटल्या शेकोट्या; 'गप्पांचा फड' पुन्हा रंगला!

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

सिल्लोड:- तालुक्यात मागील काही दिवसांपासून वातावरणात अचानक बदल झाला असून, थंडीचा कडाका चांगलाच वाढला आहे. 'गुलाबी थंडी'चे रूपांतर आता अंगात 'हुडहुडी' भरवणाऱ्या बोचऱ्या थंडीत झाले आहे. त्यामुळेच, दिवस मावळताच गावोगावी आणि शहरांमधील चौकाचौकात शेकोट्या पेटल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

रात्रीच्या वेळी थंडीपासून बचाव करण्यासाठी नागरिक घराबाहेर, मोकळया जागेत विटांची चूल मांडून त्यावर लाकूड-फाटा पेटवून शेकोटीचा आनंद घेत आहेत. केवळ थंडीपासून संरक्षण मिळवणे हा यामागचा उद्देश नसून, दिवसभराचा थकवा विसरून मित्रांसोबत चार घटका निवांत



गप्पा मारण्याचे हे हक्काचे ठिकाण बनले आहे.शेकोटीभोवती जमा झालेला मित्रपरिवार म्हणजे जणू एक 'मिनी संसद'च! या शेकोटीवर हात शेकत असताना राजकारणापासून ते क्रिकेटपर्यंत आणि शेतीपासून ते स्थानिक घडामोडींपर्यंत सर्व विषयांवर चर्चा झडत आहेत.

"यंदा थंडी जास्तच आहे बुवा.,""पाऊस चांगला झाला, आता रब्बीची पिके जोरात येतील..."

"पुढच्या इलेक्शनमध्ये काय होणार?"अशा अनेक विषयांवर खमंग चर्चा आणि हास्यविनोद या उबदार आगीच्या साक्षीने रंगत आहेत.सध्या स्वेटर आणि मफलर बाहेर निघाले असले तरी, नैसर्गिक ऊब देणाऱ्या शेकोटीची मजा काही औरच असते, असे मत नागरिक व्यक्त करत आहेत. रात्री उशिरापर्यंत या गप्पांचे सत्र सुरू असते.

अचानक वाढलेल्या थंडीमुळे सर्दी, खोकला यांसारखे आजार बळावण्याची शक्यता असते. त्यामुळे पहाटे आणि रात्री बाहेर पडताना योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे. मात्र, तूर्तास तरी गावोगावी शेकोट्यांचा धूर आणि त्याभोवती माणसांचा घोळका हेच चित्र सर्वत्र दिसत आहे.

## जोरणपाडा परिसरातील प्रमुख रस्त्यांचे तातडीने डांबरीकरण करण्याची मनसेची मागणी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी – कृष्णा गायकवाड, पिंपळगाव बसवंत**

जोरणपाडा व परिसरातील शेती रस्ते, शिववस्ती रस्ते तसेच अंतर्गत मार्गांची अवस्था दिवसेंदिवस अधिकच दयनीय होत चालली आहे. वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली असून, विद्यार्थ्यांपासून ते शेतकऱ्यांपर्यंत सर्वसामान्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात रस्त्यांवरील चिखल व खोल खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका वाढतो आणि जीवनावश्यक सेवांमध्ये खंड पडतो.

कृषी उत्पादन वाहतूक, आरोग्य सेवा, शिक्षण आणि दैनंदिन ने–आण यासंदर्भात जोरणपाडा परिसरातील रस्त्यांचे महत्त्व लक्षात घेता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे संबंधित विभागाकडे तातडीने रस्त्यांचे डांबरीकरण (BT Road/C.C.) करण्याची मागणी करण्यात आली आहे. रस्त्यांच्या निकृष्ट स्थितीमुळे ग्रामविकासात अडथळे निर्माण होत असून नागरिकांच्या अनेक वर्षांच्या मागणीकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे मनसेचे म्हणणे आहे.

**या मागणीत खालील प्रमुख रस्त्यांचा समावेश करण्यात आला आहे :**

1. जोरणपाडा – वाघेरे वस्ती (अंदाजे 2 किमी)
2. कोकाटे बाबा – युवराज गायकवाड धरण वस्ती (अंदाजे 2 किमी)
3. मारुती मंदिर, जोरणपाडा – बोडके धरण वस्ती (अंदाजे 1.5 किमी)
4. जोरणपाडा – गावंढे वस्ती (कोकण गाव शिव रस्ता) (अंदाजे 3 किमी)
5. दौलत गांगोडे – हिरामण गायकवाड वस्ती (अंदाजे 1.5 किमी)
6. जोरणपाडा – राऊत वस्ती (अंदाजे 3 किमी)

ग्रामीण अर्थव्यवस्था, शेतकऱ्यांची उत्पादन व्यवस्था, शालेय विद्यार्थी तसेच आपत्कालीन सेवा सुरळीत सुरू राहण्यासाठी या सर्व रस्त्यांचे त्वरित सर्वेक्षण करून मंजुरी देणे अत्यावश्यक असल्याचे मनसेने स्पष्ट केले. डांबरीकरणाच्या या कामांना तातडीने प्रारंभ करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

या संदर्भातील निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने दिंडोरी तालुका अध्यक्ष नामदेव देवराम गावित यांनी प्रशासनाला दिले असून, ग्रामस्थांच्या मूलभूत सुविधांसाठी मनसे पुढील काळातही ठोस पावले उचलणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

## महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्या माध्यमातून नागपूर येथे मोर्चाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्या माध्यमातून दि. १० डिसेंबर २०२५ रोजी हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र राज्यातील पोलीस पाटील यांच्या मागण्या संदर्भात सन्माननीय

आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील यांची भेट घेऊन लवकरच पोलीस पाटील यांच्या मागण्या संदर्भात हिवाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करावे . अशी मागणी पनवेल तालुक्यातील पोलीस पाटील यांच्या माध्यमातून करण्यात येणार.- कुणाल लोंढे, सचिव - रायगड जिल्हा पोलीस पाटील संघ,

बाळासाहेब शिंदे पाटील राज्याध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर येथे मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहेत. या मोर्च्या संदर्भात महाराष्ट्र राज्यातील जिल्हा , तालुका व विभागीय पातळीवर सन्माननीय उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी पनवेल कार्यालय, सन्माननीय पनवेल तहसिलदार कार्यालय - पनवेल सन्माननीय - अप्पर तहसीलदार पनवेल, सन्माननीय पनवेल शहर पोलीस ठाणे , सन्माननीय पनवेल तालुका पोलीस ठाणे. येथे पनवेल तालुका पोलीस पाटील संघाच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा पोलीस पाटील संघाचे सचिव आणि करंजाडे पोलीस पाटील कुणाल लोंढे, पोलीस पाटील संघ उपाध्यक्ष प्रदिप पाटील, पळस्पे पोलीस पाटील एकनाथ पाटील, रायगड जिल्हा पो.पा.संघ. कार्यकारिणी सदस्य विजय खुटले, पोलीस पाटील अजिवली राजेश जाधव, पोलीस पाटील आदई कैलास गरुडे, पोलीस पाटील वडवली वसंत पाटील. उपस्थित होते.

# निर्घृण हत्येविरोधात सोयगाव शहरातील सुवर्णकार समाजाचे संतप्त निवेदन!"

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

सोयगाव:-नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात डोंगराळे येथे चार वर्षांच्या निरागस चिमुकली कु. यज्ञा जगदीश दुसाने हिच्यावर अत्याचार करून निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या अमानवी घटनेचा तीव्र निषेध करत सुवर्णकार समाज महिला मंडळ व समाज बांधवांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सोयगाव पोलीस स्टेशन मार्फत सादर करण्यात आले.यावेळी सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पंकज बारवाल उपस्थित होते.

या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे अशा प्रकारचे कृत्य करणाऱ्यांना समाजात राहण्याचा कोणताही अधिकार नाही. न्याय मिळेपर्यंत समाज शांत बसणार नाही,असा इशारा देण्यात आला आहे.

**मुख्य मागण्या:**

१)आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी,

२)ही केस फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवून त्वरित निकाल देण्यात यावा,३)पीडित कुटुंबाला शासनामार्फत संरक्षण आणि आवश्यक मदत देण्यात यावी.

प्रतिक्रिया:

"चार वर्षांच्या निरागस मुलीवर अत्याचार होणे ही माणुसकीचा



अपमान आहे. आरोपीला फाशीची शिक्षा मिळेपर्यंत आम्ही शांत बसणार नाही."

**विष्णू शेठ दुसाने,सुवर्णकार समाज मंडळाचे अध्यक्ष**

"ही केवळ एका मुलीची घटना नाही, तर संपूर्ण समाजाच्या सुरक्षिततेचा प्रश्न आहे. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून न्याय द्यावा."

**महेंद्र शेठ पिळगांवकर, सुवर्णकार समाजाचे सचिव**

या निवेदनावर सुवर्णकार समाज महिला मंडळ तसेच समाजातील विविध पदाधिकारी व नागरिकांनी स्वाक्षरी केली असून न्याय मिळेपर्यंत आंदोलनाची चेतावणी दिली आहे. यावेळी

सुवर्णकार समाज सोयगाव चे अध्यक्ष विष्णू शेठ गोविंद शेठ दुसाने,उपाध्यक्ष राजू शेठ भामरे,समाजाचे सचिव डॉ. दिनकर पिंगाळकर,महेंद्रशेठ पिंगाळकर,गोपाल शेठ दुसाने, पप्पू शेठ दुसाने,बापू शेठ सोनार,युवराज विभांडिक, गजानन अंबिलवादे,महेश दुसाने,अशोक पिंगाळकर, योगेश इखनकर,मनोज देसाई, दिपक भामरे,अरुण भामरे, दत्ता दुसाने,सोमनाथ सोनार,आदि समाज बांधव निवेदन देण्यासाठी उपस्थित होते.

## थोडक्यात

### शासनाचा निधी घशात घालण्याचा गुत्तेदाराचा डाव.

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी: महादेव उप्पे**
**देगलूर (दि.०५) देगलूर**

तालुक्यातील बल्लूर फाटा ते मानूर या आंतरराज्य सीमा जोडणाऱ्या रस्त्यावर थातूरमातूर काम करून खड्डे बुजविले जात आहेत.शासनाचे नियम व अंदाजपत्रकाला केराची टोपली दाखवत या रस्त्यावर केवळ गुत्तेदाराच्या मनमर्जीप्रमाणे काम सुरू असल्याने लाखोंचा निधी वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.गेल्या काही महिन्यांपूर्वीच बुजविलेल्या खड्यांनी पूर्वीचे स्वरूप धारण केले असताना परत तोच कित्ता गिरवला जात असल्याने या कामाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कार्यवाही करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड.अंकुशराजे जाधव यांनी केली आहे. तेलंगणा व कर्नाटक या दोन राज्यांसह सीमावर्ती भागातील ४० ते ५० गावखेड्यांना जोडणाऱ्या बल्लूर फाटा ते मानूर राज्यसीमा या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झालेली आहे.गेल्या बऱ्याच दिवसांपासून या रस्त्याचे काम करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी प्रशासन व राजकीय लोकांकडे लावून धरली होती. अशातच काही महिन्यांपूर्वी या कामाचे आदेश काढून रस्त्याची डागडुजी हाती घेण्यात आली. परंतु भ्रष्ट व्यवस्था व लालची गुत्तेदाराच्या संगनमताने या रस्त्यावर केवळ डांबर-गिट्टीचे मिश्रण नैवेद्य स्वरूपात दाखवून लाखो रुपयांचा निधी खिशात घालायचे सतकार्य केले जात असल्याच्या उपलब्ध कामावरून दिसुन येत आहे. या भागातील काही नागरिक व कार्यकर्त्यांनी संबंधित निकृष्ट काम हे पायातील जोड्याने उखडत असल्याचा उत्कृष्ट व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल करूनदेखील बांधकाम विभागाने आपली झोपमोड होऊ दिली नाही हे विशेष.गेल्या काही वर्षांत कोट्यवधींचा निधी कुणासाठी खर्च केला गेला? हा प्रश्न निर्माण झाला आहे. सदर रस्त्यावरील निकृष्ट काम त्वरित थांबविण्यात येऊन स्वतंत्र गुणवत्ता तपासणी पथक अथवा तांत्रिक अधिकारीयांनी प्रत्यक्ष पाहणी करावी संबंधित कंत्राटदार व कामाच्या जबाबदार अधिकारी यांच्यावर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात यावी तसेच नागरिकांच्या उपस्थितीत व शासन नियमांनुसार गुणवत्तापूर्ण रस्ते दुरुस्तीचे काम करण्यात यावे. अशी मागणी अंकुशराजे जाधव यांनी केली आहे.

### आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचा मुंबईत संदेश मार्च

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / रमेश औताडे**



आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना सत्तेच्या सारीपाटात नेमके कोणते स्थान आहे व भविष्यात कार्यकर्त्यांना राजकारणात संधी कशी मिळेल यासाठी आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा ने मुंबईत संदेश मार्च आयोजित केला आहे. संदेश मार्च चे नेतृत्व आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे करणार आहेत. ५ डिसेंबर दुपारी २.०० वाजता चेंबूर येथिल सिद्धार्थ कॉलोनी येथून मार्च प्रारंभ होईल. गोवंडी, मानखुर्द, लाल डोंगर, रमाबाई घाटकोपर, कन्नमवार, विक्रोळी, भांडुप, मुंलूड, कलवा, ठाणे, मुंब्रा, डोंबिवली, दिवा, कल्याण, विठ्ठलवाडी, उल्हासनगर, अंबरनाथ, सायन, प्रतिक्षा नगर येथे संवाद साधत आगामी महानगरपालिका, जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत सामान्य कार्यकर्त्यांना संधी कशी मिळेल याचा ऊहापोह करण्यात येणार आहे. ६ डिसेंबर रोजी सायंकाळी फुल बाजार कामत हॉटेल येथून चेतना मार्च चे आयोजन करण्यात आले आहे. या मार्च मध्ये राष्ट्रीय महासचिव उद्धव तायडे, राष्ट्रीय संघटक देवेंद्र बागडे, मुंबई प्रभारी विकास काटे, प्रा.रमेश दुपारे, प्रविण आवळे, जयदेव चिंवडे, पौर्णिमा पाईकराव, वैशाली दुप्पटे, संगिता जेस्वार, गिता पाखरे, राजु सोनवणे हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. प्रस्तुत मार्च संपूर्ण चैत्यभूमी परिसरात जनजागृती करत आंबेडकरी समाजाच्या मतदारांचे महत्त्व किती आहे हे पटवून देण्यासाठी जनजागृती करणार आहे असे शामभाई बागुल यांनी सांगितले.

### कळंबोलीतील पतपेढीच्या माध्यमातून महिलेची फसवणूक

**कळंबोली येथील भाजी व्यवसाय करणाऱ्या महिलेची पतपेढीच्या माध्यमातून चेअरमन कडून फसवणूक**

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**



कळंबोली येथे शारदा दुशमन या भाजी व्यवसाय करत असून व्यवसायासमोर एक पतपेढी होते चांगला व्यवहार पाहून पतपेढीचे अध्यक्ष यांनी शारदा दुशम यांना संचालक पदी घेतले इथून पुढे आर्थिक फसवणूक सुरू झाली लवकरच या आर्थिक फसवणे की बाबत शारदा दुशमन पतपेढी व झालेली आर्थिक फसवणूक बाबत मोठा स्फोट करणार आहेत

## दिशा वेल्फेअर ग्रुपच्यावतीने जागतिक दिव्यांग दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :**

विक्रोळी कन्नमवार नगर येथील दिशा वेल्फेअर ग्रुप या सामाजिक संस्थेच्या वतीने ३ डिसेंबर २०२५ हा जागतिक दिव्यांग दिन



संत गजानन महाराज चौकात साजरा करण्यात आला. याप्रसंगी दिव्यांग व्यक्तींना तीन चाकी सायकल, व्हील चेअर तसेच रुग्णोपयोगी वस्तूचे वाटप इंडियन मेडीकल असोशिएशन एनईबीएस चे अध्यक्ष डॉ. हरिश पांचाळ, दिशा वेल्फेअर ग्रुपचे संस्थापक संचालक भास्कर बेरीशेट्टी व रुग्णमित्र विनोद साडविलकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास शांतीवनच्या सर्वेसर्वा निलिमा दिदि,समाजसेविका जयश्री दिदी, माजी नगरसेवक उपेंद्र सावंत, प्रभात मित्र मंडळाचे सचिव, ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे, विक्रोळी ब्लॉक काँग्रेसचे अध्यक्ष राहूल वाघधरे, विक्रोळी महिला काँग्रेसच्या अध्यक्षा प्रज्ञा कदम, भाजपा विक्रोळी पूर्व मंडळ प्रमुख केतकी सांगळे, सक्षम महिला मंडळाच्या अध्यक्षा पुजा दळवी, दिशा ग्रुपचे अध्यक्ष दिनेश बेरीशेट्टी, ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक कृष्णा काजरोळकर आदि मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी संवेदना सोशल फाऊंडेशनच्या मुक कर्णबधिर मतिमंद विद्यार्थ्यांना नित्योपयोगी वस्तू आणि संवेदना संस्थेला, ऑक्युपेशनल थेरपी संच आणि संबंधित ११ वस्तूंचे वाटप संस्थेच्या अध्यक्षा प्रिती शिरिशकर यांच्या स्वाधिन माजी नगरसेवक उपेंद्र सावंत व निलिमा दिदी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास मतिमंत विद्यार्थ्यांचा उत्साह ओसांडून वाहत होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकाश पालव भगवान कुर्ले, सहिष्णूता कांबळे, निशा जाधव, सुरेश पांचाळ यांनी बरीच मेहनत घेतली होती.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात एड्स व थॅलेसेमिया बद्दल मार्गदर्शनपर व्याख्यान...

**दैनिक.युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या रेड रिबन क्लब अंतर्गत एड्स दिनानिमित्त एड्स व थॅलेसेमिया बद्दल मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.ग्रामीण रुग्णालय सोयगाव येथील समुपदेशक सुनील वानखेडे यांनी विद्यार्थ्यांना एड्स बद्दल समुपदेशन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्ही बद्दल माहिती सांगितली तसेच विद्यार्थ्यांचे एचआयव्ही बद्दलचे गैरसमज दूर केले. . त्यांच्या समवेत समुपदेशक अतुल मुळे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर.के. बारोटे यांनी विद्यार्थ्यांना एड्स बद्दल सखोल मार्गदर्शन केले.तसेच ग्रामीण रुग्णालय सोयगाव येथील डॉ. अनिकेत घोडके यांनी विद्यार्थ्यांना थॅलेसेमिया या आजाराबद्दल सखोल मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांनी विद्यार्थ्यांना दोन्ही आजाराबद्दल सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.आर.के. बारोटे,कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ.उल्हास पाटील,प्रा. अनिल मानकर,डॉ.ग्यानबा भगत,महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.निलेश गावडे यांनी केले तर डॉ.निलेश गाडेकर यांनी या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, कार्यक्रमाधिकारी डॉ.निलेश गावडे,डॉ.पंकज गावित,डॉ. सुनील चौधरे व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.




## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे मालडुंगे ग्रामपंचायतीचे नवीन कार्यालयाचे भूमिपूजन सोहळा अरुणशेठ भगत यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

पनवेल विधानसभा मतदार संघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे सुमारे २५ लाख रुपयांच्या निधीमधून मालडुंगे येथे ग्रामपंचायत नवीन कार्यालय आणि नागरी सुविधा केंद्र बांधण्यात येणार आहे. या कामांचे भुमीपूजन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्याहस्ते बुधवारी 3 डिसेंबर 2025 रोजी झाले. या विकास कामांच्या शुभारंभावेळी ग्रामपंचायतीच्या ५ टक्के राखीव निधीमधून २ हजार रुपयांचा धनादेश जागतिक अपंग दिनानिमित्त मालडुंगे ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व सदस्य यांच्या वतीने ग्रामपंचायतीतर्फे दिव्यांग बांधवांना धनादेश वाटप करण्यात आले. बांधवांना देण्यात आला.

पनवेल तालुक्यातील पूर्वेकडील असलेली मालडुंगे ग्रामपंचायतचे व आपल्या गावचे अतिशय हुशार आणि




सर्वांना एकत्र घेऊन चालणारे आपले सरपंच सिताराम चौधरी आणि सतत धावणारे उपसरपंच जनार्दन निरगुडा व सर्व सदस्य यांच्या पाठपुराव्याने एक अतिशय कामाचे भूमिपूजन आज या ठिकाणी होत आहे.हे काम चांगलं होण्यासाठी मा.खासदार रामशेठ ठाकूर साहेबांनी पण शब्द दिलेला आहे. की आपण काही कमी पडू देणार नाही. तरी अशा पद्धतीने आपल्या कार्यालयाच्या माध्यमातून आपल्या सर्वसामान्यांचे चांगल्या पद्धतीने कामे व्हावीत. आज आम्ही कुणाला सांगायला गेलोत की मालडुंगे पर्यंत सिमेंट कॉंक्रेटरी रस्ता गेला आहे. जो इकडे येत नाही तो खरं मानत नाही. पण हे शक्य मा. खासदार रामशेठ ठाकूर आणि माननीय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली या ठिकाणी 7 ते 8 किलोमीटरचा सिमेंट कॉंक्रीट करून चा रस्ता झाला आहे.समाजपयोगी जे कामे अडली असतील ती आपण या भागात करत असतो. प्रत्येक निधी आपल्याकडे या भागात आणण्याचा आम्ही प्रयत्न करत असतो. आणि मालडुंगे ग्रामपंचायत कार्यालयाचे भूमिपूजन झाले असे भाजपचे राज्य परिषद सदस्य मा. अरुणशेठ भगत यांनी सांगितले.

मालडुंगे ग्रामपंचायतचे सरपंच म्हणाले की या ठिकाणी कार्यक्रमाला पहिल्यापासून प्रलंबित प्रश्न होता आणि त्या प्रलंबित असलेला कार्यक्रमासाठी आज या कार्यक्रमाचा आनंदाचा क्षण आहे.भरपूर वर्ष या कार्यालयात आम्ही झोपडी सारखी आम्ही या ऑफिसमध्ये दिवस काढत होते. आता आपल्या आशीर्वादाने आणि तुमच्या मार्गदर्शनाखाली आज निधी लाभलेले आहे. त्या निधीच्या जोरावर आज हा कार्यक्रम आपल्या हस्ते भूमिपूजन झाले आहे.भारतीय जनता पार्टीचे आमदार प्रशांत ठाकूर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज या भागात बऱ्याच वर्षापासून रस्ता नसलेला कोंडीचावाडी येथील रस्ता तयार करून असे अनेक रस्ते या भागात करण्यात आले. मी सरपंच म्हणून एक शासन दरबारी पाठपुरावा करतो पण त्या पाठपुरांसाठी जे आपल्या सहकार्य गरज लागते.जिथे कुठे जर आपल्याला अडथळा असेल तर तातडीने फाईल जात नाही किंवा ते काम पुढे का होत नाही पण आपल्या मार्गदर्शनाने ते काम पूर्ण होत आहे.

यावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य मा. अरुणशेठ भगत, पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, तालुकाध्यक्ष संजय पाटील,राजेश भोईर ग्रामपंचायत सरपंच सिताराम चौधरी उपसरपंच जनार्दन निरगुडा ग्रामविकास अधिकारी मोरे ग्रामपंचायत सदस्य उषा वारगडा, अर्जुन कांबडी, पत्रकार गणपत वारगडा, महसूल सेवक पद्माकर चौधरी, विकास भगत,आत्माराम भस्मा,गणेश शिद, काळुराम वाघ, राघो भस्मा, संजय जाधव,राम चौधरी व मालडुंगे ग्रामपंचायतमधील नागरिक या भूमीपूजन सोहळयासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त 5 डिसेंबरला आदिलाबाद येथून दादर चैत्यभूमीसाठी विशेष रेल्वे धावणार..

**दैनिक युवक आधार**
**जालना (अशोक ठोके)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून नांदेड रेल्वे विभागातून मुंबईला जाण्यासाठी आदिलाबाद ते दादर हि विशेष रेल्वेगाडी चालविण्यात येणार आहे, हि गाडी हुजूर साहिब नांदेड, पूर्णा, परभणी, जालना, छत्रपती संभाजीनगर मार्गे धावेल,गाडी क्रमांक 07129 आदिलाबाद ते दादर हि विशेष गाडी आदिलाबाद येथून दिनांक 05 डिसेंब 2025 शुक्रवारी सकाळी



07.00 वाजता सुटेल आणि किनवट, हिमायत नगर, भोकर, मुदखेड नांदेड, पूर्णा, परभणी, मानवत रोड, सेलू, परतूर, जालना, औरंगाबाद, लासूर, रोटेगाव, नगरसोल मनमाड, नासिकरोड, इगतपुरी, कल्याण मार्गे दादर येथे रविवारी 6 डिसेंबरला सकाळी 03.30 वाजता पोहोचेल. हि गाडी परतुर रेल्वे स्टेशन येथे दुपारी 12 वाजून 57 मिनिट वाजता येईल तर जालना येथे दुपारी 1 वाजून 41 मिनिट वाजता येईल. परतीच्या प्रवासासाठी हिच गाडी क्रमांक 07130 दादर ते आदिलाबाद हि विशेष गाडी दादर येथून दिनांक 07 डिसेंबर-2025 ला रविवारी रात्री 01.05 वाजता सुटेल आणि कल्याण, इगतपुरी, नासिक रोड, मनमाड, नगरसोल, रोटेगाव, लासूर, छत्रपती संभाजी नगर , जालना, परतूर, सेलू, मानवत रोड, परभणी, पूर्णा, नांदेड मार्गे आदिलाबादला पोहचेल. हि गाडी परतीच्या प्रवासासाठी दादर येथून रविवार 7 डिसेंबर रोजी रात्री 1 वाजून 05 मिनिटांनी निघेल व जालना येथे 9 वाजून 55 मिनिट वाजता पोहचेल व परतूर येथे सकाळी 10 वाजून 43 मिनिट वाजता येईल.या गाडीला 12 जनरल आणि 02 एस.एल.आर. असे 14 डब्बे असतील. तरी सर्व आंबेडकरी अनुयायांनी या विशेष ट्रेनचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## वसुधा फाउंडेशन अग्रेसर संस्था..
### तितिक्षा कला साहित्य संमेलन व तितिक्षा दशकपूर्ती सोहळा सपन्न

**. दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी**

तितिक्षा भावार्थ सेवांतर्गत तितिक्षा इंटरनॅशनल,पुणे आयोजित -तितिक्षा कला साहित्य संमेलन व तितिक्षा दशकपूर्ती सोहळा दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी अक्षर वेल बिल्डींग रामबाग कॉलनी,सदाशिव पेठ येथे संपन्न झाला.कार्यक्रमाचे

उदघाटन -अजया,स्वरा जम, समृद्धी संस्कृती आणि

चि.रियांश रविंद्र भवार या बालकलाकारांनी केले.तसेच कार्यक्रमासाठी ज्येष्ठ साहित्यिक आणि शिक्षण महर्षी डॉ.न.म.जोशी, प्रसिद्ध गझलकार म. भ. चव्हाण, तितिक्षा इंटरनॅशनल संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष आणि रंगकर्मी प्रिया दामले , रजनी भट, सतीश इंदापूरकर तसेच विश्वसुंदरी डॉ.प्रचिती पुंडे, डॉ. विश्वगुरू मधुसूदन घाणेकर हजर होते. याच कार्यक्रमांमध्ये काही संस्थांचा सत्कार केला गेला. त्यामध्ये वसुधा फाउंडेशन म्हणजेच वसुधा नाईक यांचा सत्कार आणि वसुधा फाउंडेशनचा सन्मान केला गेला.



वसुधा फाउंडेशनच्या कामकाजाची माहिती देण्यात आली. बाकी विविध संस्थांचा सन्मान केला गेला. कवी संमेलन झाले. विविध पुरस्काराचे वितरण झाले.सुप्रसिध्द कवयित्री सुवर्णा जाधव यांनी कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले...

# विद्यार्थ्यांनी सर्वगुणसंपन्न विशेष क्रीडा नैपुण्य पारंगत असावे-नागेंद्र म्हात्रे

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी आवरे**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास म्हणजेच बोधात्मक ,भावात्मक शारीरिक ,मानसिक, क्रीडात्मक विकास होय , खेल हे जीवनाचे अविभाज्यक अंग आहे खेळामुळे विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता चांगल्या पद्धतीने विकसित होत असतात आणि खेलामुळे आपले आरोग्य सुद्धा चांगल्या पद्धतीने राहत असते शारीरिक कसरती या आजच्या धकाधकीच्या जीवनात व्हायला हव्या कारण आज जीवन हे अगदी फास्ट होत चाललेले आहे सर्व रोगांचे मूळ जे आहे हे शरीराचे स्थूलपणा व असंतुलित आहार घेणे यासाठी व्यायाम व शालेय स्तरावर खेळाचे महत्व अधिक आहे आजचा विद्यार्थी हा ऑलिम्पिक स्तरावर चमकवा यासाठी प्राथमीक माहिती ही खेळविषयी असावी म्हणून शालेय



स्तरावर स्पर्धा आयोजित करण्यात येत असतात आत्माराम ठाकूर मिशनचे जानकीबाई जनार्दन ठाकुर स्कूल आवरेचा वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन पार पडले सदर प्रसंगी

जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूल आवरे संस्थेचे संस्थापक स्वर्गीय अशोक ठाकूर सर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून स्वर्गीय स्वर्गीय अशोक ठाकूर सर यांनी क्रिडानियो जण कस असावं हे सर याना अपेक्षित प्रथम दर्शनी क्रीडा प्रसंगीं तसेच क्रीडा ज्योत ही आवरे गावात बस स्थानक जवळ असणारा महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला मानवंदना देत क्रीडा ज्योत ही आवरे बस स्थानक ते जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कुल आवरे क्रीडा मैदानावर उद्घाटन प्रमुख नागेंद्र होते सर व विद्यार्थ्यांच्या समवेत नेण्यात आली या उद्घाटन सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी सारडे विकास मंच चे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे सर संस्थेचे अध्यक्ष प्रतीक ठाकुर सर सुयश क्लासेस आवरे चे अध्यक्ष निवास गावंड सर संस्थेचे सचिव वामन ठाकूर सर विद्यालयाच्या मुख्यद्यापीका सौ निकिता म्हात्रे मॅडम क्रीडा शिक्षक शुभम ठाकुर सर पालक व्यवस्थापन कमिटीचे सदस्य शिक्षक वर्ग व व ज्या विद्यार्थ्यांसाठी ही क्रीडा स्पर्धा होणार आहे ते सर्व विद्यालयाचे विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी हे उपस्थित होते सारडे विकास मंच चे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे सर यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले आजचा विद्यार्थी हा सर्व क्षेत्रात परिपूर्ण असावा मग अभ्यास असो अथवा मानसिक व शारीरिक खेल असो अथवा बुद्धीच्या चातुर्य असो किंवा अभ्यासक्रम किंवा हजर जबाबिपना यामध्ये विद्यार्थी अग्रेसर असावा असे मनोगत व्यक्त केले या क्रीडा महोत्सवात आपण हार असो अथवा जीत असो संयम कसा बालगावा हे सांगितलं शालेय क्रीडा स्तरावरील या क्रीडा सामन्यांमध्ये आपल्यामधील विशेष गुण शालेय स्तरावर दाखववे असं सर्व विद्यार्थ्यांना आवाहन केले अशा प्रकारे आज पासून आवरे येथील जानकीबाई जनार्दन ठाकुर स्कुल आवरे येथे वार्षिक क्रीडा महोत्सव याचा उदघाटन सोहळा पार पडला व आज पासून सुरू होणाऱ्या या महोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या

# मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेत महाराष्ट्राचा विश्वविक्रम
### गिनीज बुकमध्ये नोंद; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान होणार

**• छत्रपती संभाजीनगर ऑरिक सिटीत उद्या सोहळा**

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,संतोष पाटील**

महाराष्ट्राने 'मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेत विश्वविक्रम केला आहे. महावितरणने एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषीपंप स्थापित करण्याचा उच्चांक केला आहे. या विक्रमाची गिनिज बुकमध्ये यशस्वी नोंद झाली आहे. गिनीज बुकतर्फे विश्वविक्रम प्रमाणपत्र प्रदान सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार, दि ५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता छत्रपती संभाजीनगरच्या शेंद्रा एमआयडीसीमध्ये ऑरिक सिटी मैदानावर आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, अपारंपरिक ऊर्जामंत्री अतुल सावे, छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट, ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, ऊर्जा विभागाच्य अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर पॅनल्स आणि कृषीपंप असा संपूर्ण संच देण्याच्या ‘मागेल त्याला सौर कृषीपंप’ या योजनेत महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘मागेल त्याला सौर कृषीपंप’ योजनेच्या अंमलबजावणीवर भर दिला आहे. संपूर्ण देशात महाराष्ट्राने सर्वाधिक सौर पंप बसविण्याचा उच्चांक गाठला आहे. ‘मागेल त्याला सौर कृषीपंप’ योजनेत शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कुसुम योजनेच्या अंतर्गत केंद्र सरकारकडून ३० टक्के तर राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. त्यामुळे केवळ दहा टक्के रक्कम भरून सिंचनासाठी कृषीपंपासह संपूर्ण संच मिळतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो.

राज्यात साडेदहा लाख सौर कृषीपंप बसविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे कृषीपंपासाठी पैसे भरून वीज जोडणीची प्रतीक्षा करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा ‘पेड पेंडिंग’चा प्रश्न सुटणार आहे. ‘मागेल त्याला सौर कृषीपंप’ योजनेसाठी महावितरणने स्वतंत्र पोर्टलची निर्मिती केली आहे. शेतकऱ्यांनी पंपासाठी ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर महावितरणकडून अर्ज मंजूर केला जातो. त्यानंतर शेतकऱ्याने त्याचा हिस्सा भरायचा असतो. शेतकऱ्याकडून पंप बसविण्यासाठी एजन्सीची निवड केली जाते. पंप बसविण्याच्या ठिकाणाची महावितरण, एजन्सी व शेतकरी अशी तिघांकडून संयुक्त पाहणी केली जाते, त्यानंतर कार्यादेश दिला जातो आणि शेतात पंप बसविला जातो. पंप बसविणाऱ्या एजन्सीवर पुढच्या काळात देखभाल दुरुस्तीचीही जबाबदारी आहे.

सौर पॅनल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ शेतकऱ्यांना कृषीपंपाचे वीजबिल येत नाही. हे पंप पारंपरिक वीजपुरवठ्यावर अवलंबून नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे दिवसा कधीही सिंचन करता येते. त्यामुळे दिवसा वीजपुरवठ्याची शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होते.

# कामगार नेते महेंद्रशेठ घरत दत्ताच्या चरणी नतमस्तक
### उरण-पनवेल परिसरात दत्त जयंतीनिमित्त दिवसभर घेतले दर्शन

**दैनिक युवक आधार**
**उलवे, वार्ताहर**

उरण-पनवेल तालुक्यांत गुरुवारी दत्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विविध मंदिरांच्या दत्त जयंतीच्या निमंत्रणांना महेंद्रशेठ घरत यांनी मान देऊन उरण-पनवेल परिसरात दत्ताचे दिवसभर दर्शन घेतले. सर्व समाज गुण्यागोविंदाने सुखाने राहू दे, अशी दत्ताच्या चरणी महेंद्रशेठ घरत यांनी यावेळी प्रार्थना केली.

गव्हाण, बामणडोंगरी, मोरावे, शिवाजी नगर, पाटनोली, ओवळे, पारगाव दापोली, चिरनेर, उरण, तसेच न्हावा शेवा आणि पनवेल पोलिस ठाण्यांची मंदिरे आदी ठिकाणी ते दत्ताच्या चरणी नतमस्तक झाले. लांगेश्वर येथे गोंधळी परिवाराने, गव्हाण येथे देशमुख मराठा समाज दत्त मंदिर व्यवस्थापनाने, इतरही सर्व मंदिरात महेंद्रशेठ घरत यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी विविध ठिकाणच्या दत्त मंदिरांत भजन, कीर्तनाचे कार्यक्रम सुरू होते. भाविक रांगेत दर्शन घेत होते. अनेक मंदिरात महाप्रसाद दिला जात होता.



# त्याग, शौर्य आणि श्रध्देची महान परंपरा ‘हिंद दी चादर’ गुरु तेगबहादुर साहिब

**दैनिक युवक आधार**
**नागपूर प्रतिनिधी राहुल मडावी**

‘हिंद दी चादर’श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीत नागपूर येथे ७ डिसेंबर २०२५ रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या औचित्याने श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारा हा लेख…

मोगलांच्या अनन्वीत अत्याचारामुळे कश्मीरचा सुभेदार आपला हिंदू धर्म धोक्यात आल्याने शिखांचे नववे गुरु तेगबहादुर साहिब यांची मदत घेण्यास जातात व ‘ना पेह देना ! ना पेह सेना’ म्हणत (घाबरायचे नाही व घाबरवयाचेही नाही) हिंदू धर्मियांना मुस्लीम होण्यापासून वाचविण्यासाठी व त्यांचे रक्षण करण्यासाठी गुरु तेगबहादुर साहिब थेट मोगल बादशाह औरंगजेबाशी टक्कर घेत दिल्लीकडे कुच करतात. औरंगजेब घात करून तेगबहादुरांना आग्रा येथे अटक करतात. दिल्लीला आणून त्यांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची बळजबरी करतात. धर्मस्वाभिमानी गुरु तेगबहादुरांनी धर्मपरिवर्तनास नकार देऊन लाल चांदणीचौकात ते बलिदान देतात. त्यांचे हे बलिदान इतिहासात अमर होते भारतभूमीचे कवच म्हणून त्यांना ‘हिंद दी चादर’ म्हणून ओळखले जाते. सत्य व अहिंसेचे प्रेषित असलेल्या तेगबहादुरांनी धर्मासाठी बलिदान देवून मानवी स्वातंत्र्याचा व स्वतःस पटेल तो धर्म आचरण्याचा आदर्श भारतीयांना घालून दिला. दिल्लीच्या चांदणी चौकातील त्यांच्या शहिदस्थळी १७८३ मध्ये सरदार बघेलसिंग यांनी त्याग, शौर्य आणि श्रद्धेचा तेजपुंज असणाऱ्या सीसगंज गुरुद्वारा बांधला.

श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या सोबत अनेक समाज उभे होते विशेषत: सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, सिंधी समाजांनी या संघर्षात मोलाचे योगदान देत तेगबहादुर साहेबांनी दिलेल्या धर्म व मानवतेच्या रक्षणाची शिकवण सर्वदूर पोचवली. भाई मतीदास,भाई सतीदास आणि भाई दयाल गुरुजींच्या आत्मसन्मानासाठी आणि गुरु निष्ठेसाठी शहीद झाले. हे समाज सेवाभाव, साहस आणि श्रद्धेसाठी ओळखले जातात. दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ला परिसरातील चांदणी चौकात सीसगंज गुरुद्वारा सर्व भारतीयांना धर्मांतर विरोधात आवाज उठविण्याचा प्रेरणास्त्रोत ठरला आहे. याच ठिकाणी गुरु तेगबहादुरांनी मोगलांना आपल्या प्राणांच्या आहुतीतून भारतीयांच्या एकीचा व सद्भावनेचा संदेश दिला.

२५ मे १६७५ रोजी औरंगजेबाच्या आज्ञेनुसार जल्लाद जलालुद्दीन याने गुरु तेगबहादुरांचे शिर धडापासून वेगळे केले. आणि फतवा काढण्यात आला की, ‘जो कोणी तेगबहादुरांचे उत्तर कार्य पार पाडेल त्याचे व त्याच्या कुटुंबियांचे तुकडे करून दिल्लीच्या चारही दिशांच्या प्रवेशद्वारांवर लटकविले जातील.’अशा दहशतीच्या वातावरणामध्ये ढवळून निघालेले भारतीय मन नव्या उमेदीने उभे राहण्यासाठी धडपडू लागले. औरंगजेबाची अवज्ञा करून भाई जेतासिंह यांनी त्यांचे ‘शिर’आनंदसाहेब दरबार येथे शिखांचे दहावे गुरू आणि गुरू तेगबहादुरांचे पुत्र गुरू गोविंदसिंह यांना सुपूर्द केले. आणि इकडे भाई लखीशाह बंजारा यांनी मुलगा नाथईय्याजी यांच्या मदतीने गुरू तेगबहादुरांचे ‘धड’ दिल्लीतीलच रकाबगंज गावात आणले व आपल्या राहत्या घरात ते ठेवून घरालाच अग्नी दिला. त्यानंतर त्याच ठिकाणी पवित्र अस्थी जमिनीत पुरल्या आज तिथेच ‘रकाबगंज गुरूद्वारा’ उभा आहे.

सरदार बघेलसिंह यांनी १७८३ मध्ये दिल्ली सर करून लाल किल्ल्यावर कब्जा मिळवला. आणि गुरू तेगबहादुरांच्या शहीदस्थळी सीसगंज गुरूद्वारा बांधण्यात आला. पुढे १९३० रोजी याच गुरूद्वाऱ्याचे पुनर्निर्माण करण्यात आले. तो हाच गुरूद्वारा स्वधर्माची ज्योत भारतीयांमध्ये तेवत ठेवण्याकरिता व धर्मांतराविरूद्ध आवाज बुलंद करण्याचा व त्यासाठी प्रसंगी बलिदान देण्याचा संदेश देणारा सीसगंज गुरूद्वारा मुख्य श्रद्धास्थान ठरले आहे. भल्यामोठ्या परिसरात उभारण्यात आलेल्या या गुरूद्वाऱ्यामध्ये देश-विदेशातील सर्व धर्मीय भाविक मोठ्या श्रद्धेने मथ्था टेकण्यासाठी येतात व येथून प्रेरणा घेतात. या गुरूद्वाऱ्यामधील ‘वृक्ष’ आणि ‘विहिर’ हे ही प्रेरणादायी आहे. या वृक्षाच्या खालीच गुरू तेगबहादुर यांनी स्वधर्माभिमानासाठी प्राणाची आहुती दिली. शेजारी असलेल्या विहिरीला भावीक नतमस्तक होतात. गुरू तेगबहादुर कैदेत असताना या पवित्र विहिरीतील पाण्याचा उपयोग दिनचर्या व पिण्याकरिता करीत असत. दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ला परिसात स्थित सीसगंज गुरुद्वारा हा दिगंबर जैन अतिशय क्षेत्र लालमंदिरापासून सुरु होणाऱ्या चांदणीचौकाकडील रस्त्यावर आहे. तर संसद भवनाच्या मागील भागात रकाबगंज गुरुद्वारा स्थित आहे.

शीख धर्मियांचे मार्गदर्शक दहा गुरु आहेत. यापैकी दोन गुरु हे तेग बहादुरांचे आप्त आहेत. गुरु तेगबहादुर हे शिखांचे नववे गुरू असून सहावे शीखगुरू हरगोविंद यांचे ते सर्वात धाकटे पुत्र व शिखांचे दहावे व शेवटचे गुरू गोविंदसिंह यांचे ते पिता होत. तेगबहादुरांचा जन्म अमृतसर येथे झाला. वयाच्या ८ व्या वर्षी कर्तारपूर येथील लालचंदजी खत्री यांची कन्या गुजरी यांच्याशी तेगबहादुरांचा विवाह झाला. त्यांचे मूळ नाव त्यागमल होते. लहानपणीच त्यांना वैराग्य प्राप्त झाले. गृहस्थ असूनही ते वडिलांच्या मृत्यूनंतर बकाला येथे जाऊन विरक्तवृत्तीने राहू लागले.

शिखांचे आठवे गुरू हरकिशन यांच्या निधनानंतर १६६४ मध्ये तेगबहादुर यांना नववे गुरू म्हणून गादीवर बसविण्यात आले. त्यांनी स्वतःसाठी शिवालिक पर्वतराजीत एक नगर वसविले आणि तिथे आपली गादी स्थापून ते धर्मप्रचारासाठी यात्रा करू लागले. हे नगर आनंदपूर म्हणून पुढे शिखांचे प्रसिद्ध व पवित्र क्षेत्र बनले. पाटणा येथे त्यांचे पुत्र गोविंदसिंह याचा जन्म झाला. पुढे शिखांचे दहावे व शेवटचे गुरू गोविंदसिंह म्हणून ते उदयास आले.

गुरु तेगबहादुरांनी आसामपासून काश्मीरपर्यंत आपल्या धर्माचा प्रसार केला. त्यांनी विविध विषयांवर ११६ पद्ये रचली. ही पद्ये पुढे गुरू गोविंदसिगांनी गुरु ग्रंथसाहिबात अंतर्भूत केली. यांतील ५९ पद्ये ‘शबद’ (स्तोत्रे) आणि ५७ पद्ये ‘श्लोक’ आहेत. त्यांच्या रचनेत वैराग्य व क्षमाशील वृत्तीचा उत्कृष्ट आविष्कार आढळतो. अहिंसा व सत्याचे प्रेषित असलेल्या तेगबहादुरांनी धर्मासाठी प्राण त्याग करून मानवी स्वातंत्र्याचा व स्वतःस पटेल तो धर्म आचरण्याचा आदर्श भारतीयांना घालून दिला. त्यांच्या बलिदानाने भारतीयांमध्ये जी अस्मिता निर्माण झाली तिला इतिहासात तोड नाही. तेगबहादुर साहिब यांच्या शहिदीला ३५० वर्ष पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने यावर्षी भारतभर मोठया प्रमाणात विविध कार्यक्रम आखण्यात आले आहेत.

शीख धर्माचे दहावे गुरू श्री गोविंद साहिबजी यांची कर्मभूमी ही महाराष्ट्रातील श्री हुजूर साहिब नांदेड असून याठिकाणी त्यांनी सर्व शीख बांधवांना उद्देशून, 'सब सिक्खन को हुकम हे गुरू मान्यो ग्रंथ साहिब' असा उपदेश दिला होता. हा मानवतेचा संदेश घरोघरी पोचविण्यासाठी व श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या त्यागाची शिकवण समाजाच्या सर्व घटकांत पोचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने आखलेल्या कार्यक्रमाची सुरुवात सर्व धर्म समाभावाची भूमी नागपूर येथे होत आहे.

‘हिंद दी चादर’ श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त राज्यभर विविध प्रबोधनपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. याअंतर्गत नागपूर येथील नारा परिसरातील सुरेश चंद्र सुरी मैदानावर ७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची या विशेष कार्यक्रमास उपस्थिती असणार आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्यावर भारतीय डाक विभागामार्फत विशेष टपाल तिकीट जारी करण्यात येणार आहे.सिंधी आणि पंजाबी समाजाच्या इतिहासाचे दर्शन घडविणाऱ्या ऐतिहासिक शस्त्रांची प्रदर्शनी लावण्यात येणार आहे. शीख,सिकलीगर,बंजारा,लबाना,मोहयाल,वाल्मिकी आणि सिंधी समाजाचे लोक एकत्र येऊन हा ऐतिहासिक समागम कार्यक्रम साजरा करणार आहेत.

श्री गुरु तेग बहादुर साहिब यांचा धर्मरक्षण, सहिष्णुता आणि मानवतेचा संदेश महाराष्ट्रातील घराघरांत पोहचविण्याच्या उद्देशाने आयोजित या विशेष कार्यक्रमाचे नागपूर नंतर नवी मुंबई येथे २१ डिसेंबर २०२५ रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि २४ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य कार्यक्रम होणार आहे. नागपूरसह अन्य ठिकाणी आयोजित होणाऱ्या या कार्यक्रमातून ‘हिंद दी चादर’ श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या कर्तुत्व आणि विचारांचा परिचय जनतेला होणार आहे.

**रितेश मो.भुयार,**
**माहिती अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क,**
**नागपूर.**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच भारतीय संविधानाचे एकमेव शिल्पकार -ॲड.डॉ.सत्यपाल कातकर

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

छत्रपती संभाजीनगर -येथे महार रेजिमेंट चे माजी सैनिक व ऑल इंडिया समता सैनिक दल,डिव्हिजन व ट्रेनिंग सेंटर औरंगाबाद द्वारे आयोजित कार्यक्रमात "भारतीय संविधानाचे एकमेव शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर व सांसदिय लोकशाही" या विषयावर प्रसिद्ध मनोवैज्ञानिक, डॉ.सत्यपाल कातकर,

अधिवक्ता,उच्च न्यायालय तथा संविधानतज्ञ दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते..

सर्वप्रथम महार रेजिमेंटचे माजी सैनिक व ऑल इंडिया समता सैनिक दल तर्फे क्रांती चौक येथून संविधान सन्मान रॅली काढण्यात आली व त्यानंतर नंदनवन कॉलनी येथील वामनदादा कर्डक खुले प्रांगणात जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले.याप्रसंगी कार्यक्रमाचे मार्गदर्शक श्री शिरीषजी बनसोडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद जालना यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी संविधान निर्मितीत कसे महत्वपूर्ण योगदान दिले ह्यांचे विस्तृत मुद्देसूद मत व्यक्त केले तर परिसवांदाचे मुख्य मार्गदर्शक डॉ.सत्यपाल कातकर,

संविधानतज्ञ तथा अधिवक्ता,उच्च न्यायालय म्हणाले, "डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्यांना संविधान सभेत येण्यास अतोनात विरोध झाला,ते बंगाल प्रांतातून जोगेंद्रनाथ मंडल व शेड्युल कॉस्ट फेडरेशनच्या सहयोगाने संविधान सभेत सदस्य म्हणून नियुक्त झाले व दिनांक १७ डिसेंबर १९४६ ला संविधान सभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी मार्गदर्शन केले ज्यात भारताच्या अखंडतेची व भविष्यात निर्माण होणाऱ्या युद्धजन्य परिस्थितीची व मुस्लिम लीगची भूमिका ह्यावर व आपसातील मतभेद बाजूला सारून एकत्रित आल्यास ह्या देशाला अखंडते पासून कुणीही रोखू शकत नाही असे विद्वतापूर्ण मार्गदर्शन केले यामुळेच बंगालची फाळणी झाल्यावर डॉ. आंबेडकरांचे सदस्य गेल्यानंतर त्यांना मुबंई प्रांताचे मुख्यमंत्री बी.जी.खेर ह्यांनी डॉ.राजेंद्र प्रसाद ह्यांचे आदेशानुसार संविधान सभेत मुंबई प्रांतातून पुन्हा संविधान सभेत पाठविण्यात आले व बिझनेस कमिटीने त्यांना दिनांक २९ ऑगस्ट १९४७ ला मसुदा कमिटीच्या चेअरमन पदी नियुक्त केले. ब्रिटिश राजवटीत भारत सरकार कायदा १९३५ ब्रिटिश संसदेने मंजूर व केला ज्यात १४ भाग,



३२१ कलम, १० परिशिष्ट्ये होती तर भारतीय संविधान डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या बुद्धी कौशल्याचा वापर करून ३९५ अनुच्छेद २२ भाग,अनुसूची ८ मूळ स्वरूपात २ वर्षे ११ महिने १७ दिवस अथक परिश्रम घेऊन मसुदा कमिटीचे चेअरमन म्हणून संविधानसभेत अनेक मुद्द्यावर वादळी उत्तरे देऊन मुद्देसूद मांडणी करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला लिखित संविधान दिले त्यामुळे कुणी कितीही विरोधात ओरड केली तरीही सत्य हेच आहे की डॉ.बाबासाहेब आंबेडकर हेच भारतीय संविधानाचे एकमेव शिल्पकार आहेत तसेच हजारो जाती व प्रांतात विभाजीत देशाला एकसंघ ठेवण्यासाठी नावीन्यपूर्ण सांसदीय लोकशाही दिली ज्यात विधिमंडळ, कार्यकारी मंडळ,

न्यायपालिका ह्यां तीन अंगात अधिकाराची विभागणी केली त्यात राष्ट्रपती,राज्यपाल,प्रधानमंत्री,सुप्रीम कोर्ट व हायकोर्ट,नियंत्रक व महालेखापरीक्षक, निवडून आयोग आदीची रीतसर विभागणी केली. गोलकनाथ, केशवानंद भारती, मीनरव्हा मिल्स ह्या सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचे कायदेशीर दाखले देऊन डॉ.सत्यपाल कातकर म्हणाले "भारतीय संविधानाच्या मुळ सिद्धांताना कुठेलेही सरकार हात लावू शकत नाही. विधिमंडळ व कार्यकारी मंडळ ह्यांना नियंत्रित करण्यासाठी स्वतंत्र न्यायव्यवस्था निर्माण केली आहे व सामान्य जनतेचे मौलिक अधिकार, न्यायिक अधिकार ह्यांचे कुणी हनन करू नये यासाठी अनुच्छेद

२२६ व ३२ द्वारे न्यायिक अधिकार दिलेत.सुभाष कश्यप,

अनिल मिश्रा

यांचेद्वारे निर्माण होत असलेल्या संविधान संभ्रमावर रोखठोकपणे संविधानतज्ञ म्हणून उत्तरे दिलीत तसेच संविधानाचे संरक्षण करण्यासाठी संविधानतज्ञ अर्थात विद्वान वकिलांची फौज तयार करण्याचे आव्हान केले व रोखठोकपणे मुद्देसूद विचार व्यक्त केले."याप्रसंगी ऋषिजी वाघमारे, समाज क्रांती आघाडी ह्यांनीही थोडक्यात मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सुभेदार लेफ्टनंट बाजीराव सोनुने होते तर विचारमंचावर सुभेदार विलास शिरसाठ, कारभारी त्रिभुवन,अध्यक्ष, ऑल इंडिया समता सैनिक दल व दादासाहेब राजहंस होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक कारभारी त्रिभुवन ह्यांनी केले तर सूत्रसंचालन ॲड. प्रज्वलीत बनसोडे,ॲड. मयुरी बोर्डे व ॲड. आम्रपाली वावळे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भीमराव घोरपडे, कमलबाई त्रिभुवन, दिलीप गंगावणे, प्रियंका अंभोरे, शंकर मस्के, संगीता भगत, शोभा जगताप आदिनी अथक परिश्रम घेतलेत.

## अब्दुल भैय्या प्रतिष्ठान कडून आंदोलनं करताच सर्व मागण्या मान्य.

**दैनिक युवक आधार**
**नेवासा प्रतिनिधी:- लखन वाल्हेकर**

* प्राथमिक आरोग्य केंद्रात चौकशी कक्ष तयार करण्यासाठी व औषधे पुरवठा मिळण्यासाठी आंदोलन करताच सर्व मागण्या मान्य.*

नेवासा मतदारसंघातील कुकाना ग्रामपंचायत क्षेत्रात प्राथमिक आरोग्य केंद्राबाबत नागरिकांकडून सातत्याने विविध उपलब्ध नसल्यामुळे होणारी गैरसोय याकडेही लक्ष वेधण्यात आले. तसेच औषधे पुरवठा वाढवावा या साठी मागणी करण्यात आली *प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रमुख डॉ. कानडे सर* यांनी आजच्या दिवसातच लस उपलब्ध करून देण्याचे तसेच इतर आवश्यक औषधसामग्री तत्काळ उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

२५ खेड्यात प्रसिद्ध असलेले अधिकारी यांच्या निष्क्रिय व्यवस्थापन मुळे मिळत नसल्याने नागरिकांची मोठी अडचण होत होती या वर अब्दुल भैय्या शेख प्रतिष्ठान तर्फे आंदोलन करण्यात आले. या वर लगेचच मागण्या मान्य करत चौकशी कक्ष लावण्यात आला व या पुढे अशी अडचण होणार नाही असा शब्द डॉ कानडे यांनी दिला. या आंदोलनात अब्दुल भैय्या शेख, अभिराज अरगडे, मकरंद राजहंस,



तक्रारी येत होत्या. या तक्रारींची दखल घेत आज तालुक्याचे THO तसेच जिल्ह्याचे DHO यांना संपर्क साधत नागरिकांच्या सुविधांसाठी ' *माहिती देणारे चौकशी कक्ष'* सुरू करण्याची मागणी करण्यात आली. यावर तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत *प्रशासनाने ही मागणी मान्य केली. व लगेच चौकशी कश लावण्यात आले*

यावेळी कुकाना परिसरातील *कुत्र्यांच्या चावण्याच्या वाढत्या घटना* आणि त्या संदर्भात लस कुकाणा प्राथमिक आरोग्य केंद्रात गांधीवादी मार्गाने आंदोलन करत सर्व स्टाफ ला गुलाबाचे फुल देत आंदोलन करण्यात आले. येणाऱ्या काळात नागरिकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने सातत्याने लक्ष द्यावे, अशी विनंतीही करण्यात आली. दररोज सुमारे १५०पेक्षा जास्त रुग्ण येथे येत असतात मात्र त्यांना दवाखान्यात आल्यावर व्यवस्थित माहिती दिली जात नाही तसेच लस व औषधे देखील तालुका वैद्यकीय संतोष वडागळे, शुभम धनवटे, ओंकार लाड, सोपान धनवटे, अनिकेत ताके, प्रणव गहाळ, संदीप कोकरे, अर्जुन गवारे, आर्यन गहाळ, महादेव कोकरे, कृष्ण कोठुळे, गौरव गोसावी, संदीप कोकरे, अमोल कोकरे, साईनाथ मुळे,, सिद्धार्थ वाघमारे, सिद्धार्थ हरवणे, सर्फराज शेख, व अब्दुल भैय्या प्रतिष्ठान चे पदाधिकारी व गावातील सहकारी उपस्थित होते. या प्रसंगी अब्दुल भैय्या सामाजिक प्रतिष्ठानचे उपस्थित नागरिकांनी आभार व्यक्त केले.

## उरण फाटा सर्व्हिस रोड आणि कळंबोली स्टील मार्केट येथील १० तृतीयपंथीयांवर गुन्हे शाखेने केली कारवाई

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

: उरण फाटा सर्व्हिस रोड आणि कळंबोली स्टील मार्केट येथील १० तृतीयपंथीयांवर गुन्हे शाखेने कारवाई केली आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात तृतीयपंथीयांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांनी कक्षाकडील अधिकारी व अंमलदार यांच्या दोन टिम तयार करून "नवी मुंबई आयुक्त परिसरातील उरण फाटा सर्व्हिस रोड व कळंबोली स्टील मार्केट रोड येथे तोकडे कपडे परिधान करून रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना टाळया वाजवुन हातवारे, बिभत्स हावभाव व अश्लिल चाळे करत असताना मिळुन आल्या. त्यावरून उरण फाटा सर्व्हिस रोड येथुन ५ तृतीयपंथी तसेच कळंबोली





स्टील मार्केट रोड येथुन ५ तृतीयपंथी ताब्यात घेवुन त्याच्या विरूध्द सीबीडी व कळंबोली पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल केले आहेत. सदरची कारवाई सहा. पोलीस आयुक्त धर्मपाल बनसोडे यांच्या यांचे मार्गदर्शनाखाली वपोनिरी पृथ्वीराज घोरपडे, सपोनि राजश्री शिंदे, पोउपनिरी सरिता गुडे, पोशि ठाकुर, पोशि चव्हाण, पोशि पारासुर, मपोना अडकमोल, मपोना भोये, चालक पोहवा हांडे यांनी केली आहे.

## वाफगाव येथे महाराजा यशवंतराव होळकर यांचा २५० वा जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न!

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

वाफगाव, जि. पुणे: मराठा साम्राज्याचे शूर सेनानी, महाराजा यशवंतराव होळकर यांच्या २५० व्या जन्मोत्सव दिनानिमित्त वाफगाव येथील ऐतिहासिक होळकर वाड्यामध्ये (Hokar Wada) भव्य सोहळा आणि गावात मिरवणूक काढण्यात आली. हा जन्मोत्सव मोठ्या धामधुमीमध्ये आणि उत्साहात साजरा करण्यात आला.



सकाळच्या सत्रात महाराजा यशवंतराव होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. यानंतर संपूर्ण गावात महाराजांच्या प्रतिमेची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली, ज्यामध्ये गावातील नागरिक आणि परिसरातील मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या ऐतिहासिक सोहळ्यासाठी योगेश राजे होळकर, अभिनन्यु राजे होळकर, किशोर आण्णा कुमठेकर, अभय काळे, नवनाथ पडळकर, अविनाश धायगुडे, व्याख्याते राज होळकर, विक्रांत काळे, पप्पू राजे होळकर, योगेश काळे, विकास माने, विठ्ठल कडू, गजानन ठोंबरे, राहुल सलगर, विठ्ठल सरगर, अनुराग काळे, प्राचार्य सोमनाथ नगर, डॉक्टर शरद गलांडे, धनंजय ताणले, मृणाल ढोले पाटील, सरदार राजोळे, विजया कोकाटे, महेश पिंगळे आणि खंडू तांबडे यांसारखे मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी महाराजा यशवंतराव होळकर यांच्या पराक्रमाचे आणि लोककल्याणकारी कार्याचे स्मरण केले, तसेच त्यांच्या २५० व्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन केले.

# उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची डॉ. गौरी पालवे-गर्जे आत्महत्याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशीची मागणी

## गौरीच्या आई–वडिलांसह घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

*"महिलांच्या सुरक्षिततेसाठी राज्यव्यापी उपाययोजना राबवा; विवाहपूर्व समुपदेशन अनिवार्य करण्याची डॉ. गोऱ्हे यांची मागणी"*

**दैनिक युवक आधार**
**मुंबई/प्रतिनिधी :** डॉ.गौरी पालवे-गर्जे यांच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी निर्माण झालेल्या संतापाच्या पार्श्वभूमीवर विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीस पीडितेचे आई-वडील तसेच प्रख्यात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया उपस्थित होत्या. भेटीनंतर माध्यमांशी बोलताना डॉ. गोऱ्हे यांनी या प्रकरणात गंभीर विसंगती असून त्या मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्याचे सांगितले. तपासावर कोणताही दबाव नसल्याचे मुख्यमंत्री यांनी स्पष्ट केले असून, कोणताही हस्तक्षेप सहन करणार नसल्याचेही त्यांनी ठामपणे सांगितले.

डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, कुटुंबीयांनी मांडलेल्या मुद्द्यांनुसार ही आत्महत्या नसून खून असू शकतो, असा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. संबंधित प्रकरणात भारतीय न्याय संहिता कलम ८५ (IPC कलम ४९८अ )अंतर्गतही गुन्हा दाखल असून, छळ आणि मानसिक अत्याचाराचा स्पष्ट उल्लेख आहे. डॉ. गोऱ्हे यांनी या संदर्भात मुख्यमंत्र्यांना लेखी निवेदन सादर केले असून, तपासाची देखरेख एक महिला आयपीएस अधिकारी यांनी करावी, अशीही विनंती करण्यात आली आहे.

डॉ. गोऱ्हे यांनी म्हटले की, "डॉ. गौरीसारख्या सुशिक्षित, विद्वान मुलींचे अशाप्रकारे मृत्यू होणे ही केवळ व्यक्तिगत शोकांतिका नसून सामाजिक वेदना आहे. मी उपसभापती, स्त्री आधार केंद्राची अध्यक्षा आणि एक आई म्हणून अत्यंत संतप्त आहे." एक डिसेंबर रोजी त्यांनी पीडित कुटुंबीयांची भेट घेतली होती, त्यानंतर पुन्हा मुंबईत परतून त्यांनी याबाबत शासन पातळीवर पाठपुरावा केला.



*डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनातील महत्त्वाचा आशय :*

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, डॉ. गौरी पालवे गर्जे यांच्या मृत्यूमुळे राज्यभर तीव्र दुःख व असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. कुटुंबीयांच्या आरोपांनुसार दीर्घकाळ मानसिक छळ, तणाव आणि कौटुंबिक अत्याचारामुळे हा मृत्यू घडल्याची शक्यता आहे. त्यामुळे तपास दबावमुक्त, पारदर्शक आणि निष्पक्ष राहणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

डॉ. गोऱ्हे यांनी प्रकरणात स्वतंत्र उच्चस्तरीय विशेष चौकशी समिती (एसआयटी) नियुक्त करण्याची मागणी केली आहे. या समितीत वरिष्ठ पोलीस अधिकारी, महिला संवेदनशील संस्था, मनोवैज्ञानिक आणि कायदेतज्ज्ञांचा समावेश करावा अशी मागणी आहे. चौकशीत कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ नये, यासाठी स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी विनंती करण्यात आली आहे.

तसेच, पीडित कुटुंबावर कोणताही दबाव येऊ नये यासाठी विशेष संरक्षण, तातडीची कायदेशीर मदत, मानसिक समुपदेशन, तसेच गरजेनुसार आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनात करण्यात आली.

प्रकरणाचा तपास कालबद्ध पद्धतीने, म्हणजे तीस दिवसांत प्राथमिक आणि दहा दिवसांत अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी सुद्धा करण्यात आली आहे.

याशिवाय, महिलांच्या सुरक्षिततेसह मानसिक आरोग्याच्या दृष्टीने राज्यातील तरुण मुलींसाठी महाविद्यालयीन स्तरावर विवाहपूर्व समुपदेशनाची अनिवार्यता लागू करावी, व्यापक जनजागृती मोहीम राबवावी, प्रशिक्षित समुपदेशकांची नियुक्ती, गोपनीय तक्रार नोंद प्रणाली आणि भावनिक सक्षमीकरण सत्रे सुरु करावीत, अशा ठोस उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले की, "हा केवळ एका कुटुंबाचा शोक नाही, तर राज्यातील महिलांच्या सुरक्षिततेचा आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वासाचा प्रश्न आहे. म्हणून त्वरित आणि ठोस कार्यवाही अत्यावश्यक आहे."

# फेरीवाल्यांचा नवा अवतार : ‘मोबाईल डिमार्ट’ बनला गावांचा आधार"

**दैनिक युवक आधार**
**म्हसळा तालुका प्रतिनिधी**
**. शिरीष समेळ**

ग्रामीण भारतातील बाजारपेठेचे स्वरूप गेल्या काही वर्षांत झपाट्याने बदलू लागले आहे. एकेकाळी गावोगावी फिरून सेवा देणाऱ्या पारंपरिक फेरीवाल्यांनी ग्रामीण व्यापाराचा पाया रचला. भंगार खरेदी करणारे फेरीवाले, बांगड्या विकणारे बांगडीवाले, कलई करणारे कारागीर, चाकू–सुऱ्यांना धार लावणारे कामगार या सर्वांनी ग्रामीण भागातील दैनंदिन गरजा वर्षानुवर्षे पूर्ण केल्या. परंतु तंत्रज्ञानाचा वेग, ऑनलाईन व्यवहारांची भरारी आणि शहरीकरणाचा विस्तार यामुळे ही पारंपरिक व्यवस्था हळूहळू मागे पडू लागली.

ग्राहकांच्या खरेदी सवयींमध्ये झालेल्या बदलांमुळे ‘एकाच ठिकाणी सर्व’ ही संकल्पना बलवत्तर झाली. सहकारी बाजार, शेतकरी बाजार, ग्राहक पेठा ते पुढे शहरांमध्ये उदयास आलेली मॉल संस्कृती आणि त्यातूनच निर्माण झालेल्या ‘डिमार्ट’सारख्या



मोठ्या चेन स्टोअर्सनी बाजारपेठेवर आपली मजबूत पकड निर्माण केली. मात्र ही सुविधा मुख्यतः शहरी आणि निमशहरी भागापुरतीच मर्यादित राहिली. परिणामी ग्रामीण ग्राहकाला किराणा, कपडे, प्लास्टिक व स्टील साहित्य, फळभाज्या, खेळणी, घरगुती वस्तू अशा विविध गोष्टींसाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत असे.हीच उणीव ओळखून म्हसळा तालुक्यासह ग्रामीण भागातील काही चतुर उद्योजकांनी विक्री पद्धतीत अभिनव बदल घडवून आणला. पूर्वी एका विशिष्ट वस्तूची विक्री करणारे फेरीवाले आता एकाच वाहनात दैनंदिन जीवनातील अनेक प्रकारच्या वस्तू ठेवून गावोगावी फिरू लागले. हंगामानुसार छत्र्या–रेनकोटपासून ते प्लास्टिक वस्तू, स्टील साहित्य, धान्य साठवणीचे डबे, साबण–शॅम्पू, प्लास्टिक खुर्च्या, फोल्डिंग टेबल, संक्रांती-सणासुदीच्या वस्तू, अगदी छोटे इलेक्ट्रॉनिक आयटमही आता या वाहनांवर सहज उपलब्ध होऊ लागले.ग्राहकाच्या दारापर्यंत सर्व वस्तू उपलब्ध करून देणाऱ्या या संकल्पनेला ग्रामीण भागात नाव मिळाले— “मोबाईल डिमार्ट”. मोठ्या कंपन्यांनी अजून पाऊल न ठेवलेल्या बाजारपेठेत या लघुउद्योजकांनी स्वतःची संधी शोधली आणि कमी भांडवलात मोठा बाजार तयार केला. ग्रामीण ग्राहकाच्या मर्यादित वाहतूक साधनांचा, वेळेच्या टंचाईचा आणि तातडीच्या गरजांचा विचार करून सेवा देणाऱ्या या फिरत्या दुकानांनी लोकांच्या विश्वासात स्थान मिळवले.

या नव्या व्यापार पद्धतीमुळे ग्रामीण समाजात काही महत्त्वाचे बदल घडत आहेत ग्राहकाला एकाच ठिकाणी अनेक वस्तू उपलब्ध होत असल्याने वेळ आणि खर्चाची बचत झाली स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी वाढली हळूहळू ग्रामीण खरेदी सवयींमध्ये आधुनिकतेकडे झुकणारा गुणात्मक बदल झाला पारंपरिक फेरीवाल्यांचे व्यवसाय कौशल्य नव्या स्वरूपात उदयाला आले ग्रामीण भागात ‘एकाच ठिकाणी सर्व’ या संकल्पनेची मजबूत पाळेमुळे रोवली गेली सध्याचा ग्रामीण ‘डिमार्ट’ हा मोठ्या मॉलचा पर्याय नसला तरी ग्राहकाभिमुख सेवा, वाजवी दर, सोयीस्कर उपलब्धता आणि वेळेची बचत या गुणांमुळे त्याचा स्वीकार वेगाने वाढत आहे. प्रत्यक्षात, हे फिरते दुकानदारच ग्रामीण भागातील रिटेल क्रांतीचे नवे वाहक ठरत आहेत. ग्रामीण बाजारपेठेची ही रूपांतरणाची प्रक्रिया पुढील काळात आणखी मोठी वाढ घेईल, हे निश्चित. मोठ्या कंपन्यांचे पाऊल ग्रामीण बाजारात अद्याप सावधपणे पडत असले तरी स्थानिक उद्योजकांच्या नवोन्मेषी पद्धतीमुळे ग्रामीण भागातही आधुनिक ग्राहकव्यवस्था उभी राहत आहे. पुढील काळात या “मोबाईल डिमार्ट” संकल्पनेचा व्याप अधिक वाढेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा प्राप्त होईल हे निश्चित. गावागावात फिरणारी ही नव युगाची दुकाने आज फक्त वस्तू विकत नाहीत, तर ग्रामीण ग्राहकांच्या दैनंदिन जीवनाला सोयीची, सुटसुटीत आणि आधुनिक दिशा देत आहेतआणि म्हणूनच म्हसळा तालुक्यातील फिरते मोबाईल डिमार्ट हा ग्रामीण ग्राहकांचा नवा आधार ठरतो आहे.

## बोरिवली आणि खोपोली येथे साजरा होणार श्री दत्तजयंती उत्सव

**दैनिक युवक आधार**
**खालापुर/संतोष शेवाळे**

सद्गुरू भाऊ महाराज करंदीकर यांनी स्थापन केलेल्या "ओम सद्गुरू प्रतिष्ठान" या परमहंस परिव्राजकाचार्य श्री वासुदेवानंद सरस्वती टेम्बेस्वामी महाराज यांच्या बोरिवली आणि खोपोली येथील स्थानांवर यंदाचा श्रीदत्तजयंती उत्सव मार्गशीर्ष १५ शके १९४७ म्हणजेच गुरुवार ४ डिसेंबर २०२५ रोजी साजरा होत आहे. श्रीदत्तजयंती निमित्त दोन्ही स्थानांवर सकाळी महापूजा आणि रुद्राभिषेक करण्यात येईल. ओम सद्गुरु प्रतिष्ठान, मोगलवाडी, खोपोली येथे सकाळच्या सत्रात प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज व परमपूज्य सद्गुरु आनंदयोगेश्वर निळकंठ महाराज यांची महापूजा, रुद्राभिषेक पवमान सूक्तपठण संपन्न होईल तसेच संध्याकाळच्या सत्रात सद्गुरु भाऊ महाराज करंदीकर तथा आनंदयोगेश्वर निळकंठ महाराजांच्या अमृतवाणीत होणाऱ्या श्रीदत्तजन्म अध्यायाचे




वाचन व नंतर "नमो गुरवे वासुदेवाय" या नामजपाचा गजर याच्या श्रवणाचा लाभ घेता येईल. संध्याकाळी ७.२५ वाजता स्वामी महाराजांची आरती होईल. या उत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे आरती नंतर रात्री ८.१५ वा. होणाऱ्या स्वामी महाराजांचा पालखी सोहळा! या पालखी सोहळ्यानंतर दर्शन, तीर्थ व महाप्रसाद होऊन या उत्सवाची सांगत होईल. या उत्सवाला जास्तीत जास्त भक्तांनी हजेरी लावून प प श्रीमद वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे व सद्गुरू भाऊ महाराज करंदीकर यांचे आशीर्वाद प्रदान करून घ्यावेत असे विनम्र आवाहन विश्वस्तांनी व अश्वपरीस फाऊंडेशन संस्थापक अध्यक्ष इशिका शेलार यांनी केले आहे.

## मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिना निमित्त पाटोदा पत्रकारांची आरोग्य तपासणी शिबिर संपन्न





**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -**

मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिना निमित्त पाटोदा तालुका पत्रकार परिषदेतर्फे ग्रामीण रुग्णालय, पाटोदा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तालुक्यातील विविध माध्यमांतील पत्रकारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत हृदयविकार तपासणी, रक्तदाब, साखर, हिमोग्लोबिन सह विविध आरोग्य तपासण्या करून घेतल्या. पाटोदा ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. अभिषेक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांनी तपासण्या करून आवश्यक सल्ला दिला. बदलती जीवनशैली, ताणतणावाचे व्यवस्थापन आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व या बाबत ही डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. पत्रकार आपल्या कामाच्या धावपळीत आरोग्याकडे दुर्लक्ष करतात, अशा उपक्रमामुळे योग्य आरोग्य जागरूकता निर्माण होते, अशी भावना या वेळी व्यक्त करण्यात आली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ.खाडे, डॉ.तागड, डॉ.ओमासे मॅडम, डॉ.सबिया मॅडम,भागवत गर्जे, परिचारिका, चौले (बडे) मॅडम, डोरले मॅडम, बांगर, सानप, राख, ससाणे मामा, तात्या नागथाई तसेच ग्रामीण रुग्णालयातील सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास मराठी पत्रकार परिषदेचे जेष्ठ पत्रकार छगन मुळे, जिल्हा उपाध्यक्ष कादर मकराणी, इद्रीस चाऊस, दयानंद सोनवणे, श्रीरंग लांडगे, सचिन पवार, डिगंबर नाईकनवरे, तालुकाध्यक्ष अजय जोशी, सचिव हमीदखान पठाण, हल्ला कृती समितीचे तालुकाध्यक्ष संजय सानप, उपाध्यक्ष अशोक भवर, जावेद शेख, अनिल गायकवाड, शहराध्यक्ष सय्यद फय्याज, सलीम शेख, पवनकुमार भोकरे, सय्यद इम्रान, डिजिटल मीडिया उपाध्यक्ष डॉ.हरिदास शेलार, दत्ता देशमाने यांच्या सह अनेक पत्रकार बांधव उपस्थित होते. उपक्रमाला मिळालेल्या प्रतिसादामुळे पुढील काळात अशा उपयुक्त उपक्रमांचे आयोजन करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

## 'दिव्यत्वाचे पूजन': भराडीच्या ज्ञानविकास विद्यालयात दिव्यांग दिनानिमित्त प्रेरणादायी उपक्रम दुर्दैव नव्हे, नशिबाचा भाग!

### ज्ञानविकास शिक्षण संस्थेचे प्रमुख अशोकदादा गरुड यांनी व्यक्त केले मत

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:- योगेश पालोदकर**

सिल्लोड:- तालुक्यातील भराडी येथील अशोकदादा गरूड शैक्षणिक समूहाचे ज्ञानविकास विद्यालय आणि जिल्हा परिषद शाळा भराडी यांच्या संयुक्त विद्यमाने ३ डिसेंबर रोजी जागतिक दिव्यांग दिन अत्यंत प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी दिव्यांगांप्रति सन्मान, आदर आणि सहानुभूतीचा संदेश देण्यात आला.

ज्ञानविकास विद्यालयातील कार्यक्रमात डोळ्याने दिव्यांग असलेल्या सय्यद फैजान आणि हाताने दिव्यांग असलेल्या सागर महाकाळ या विद्यार्थ्यांचे औक्षण आणि पूजन करून त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी संस्थेचे प्रमुख अशोकदादा गरूड यांनी आपले मौलिक मत व्यक्त केले. ते म्हणाले, "दुर्दैवाने दिव्यांगत्व व्यक्तीच्या आयुष्यात येत असेल, तर तो त्याच्या नशिबाचा भाग आहे. परंतु अशा व्यक्तीस सहानुभूती देणे, जिव्हाळा



लावणे, प्रेमाने वागवणे आणि शक्य होईल ती मदत करणे, हे आपले आद्य कर्तव्य आहे." गरूड यांनी दिव्यांगाची चेष्टा किंवा अवहेलना होणार नाही यासाठी समाजाने दक्ष राहण्याचे आवाहन केले. तसेच, आपल्याला लाभलेले मौल्यवान अवयव जपणे किती महत्त्वाचे आहे, यावरही त्यांनी भर दिला.

दिव्यांग दिनासोबतच याच कार्यक्रमात अहिराणी बोलीभाषेला कवितेतून मोठी उंची मिळवून देणाऱ्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांना त्यांच्या स्मृती दिनानिमित्ताने विनम्र अभिवादन करण्यात आले. विद्यार्थी यश अक्कर, भक्ती जाधव आणि समीक्षा काकडे यांनी बहिणाबाई चौधरी यांच्या जीवनचरित्रावर मनोगत व्यक्त केले. याचबरोबर, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतही दिव्यांग दिनाचे महत्त्व जपण्यात आले. या शाळेतील विद्यार्थ्यांनी एक फेरी काढत दिव्यांगांना सन्मान देणारे विविध घोषणा आणि घोषवाक्ये देत संपूर्ण समाजात मानवतेचा संदेश पोहोचवला. या कार्यक्रमास केंद्र प्रमुख राजू महाजन, दीपक सोनवणे, समाधान काकडे, सय्यद मुश्ताक, मथाजी काकडे यांच्यासह योगिता दुसारिया, प्रतिभा वाघ, डिम्पल राऊत, श्रीमती अतिका, श्रीमती फिरदोस, श्रीमती हुमेरा, श्रीमती परवीन अशा सर्व शिक्षक-शिक्षिका आणि शालेय समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## कामोठे भूखंड प्रकरणात माझा कोणताही गैरव्यवहार नाही

### गणेश वाघिलकरकडून पैशाची मागणी आणि बदनामीचा सतत प्रयत्न - माजी नगरसेवक सुनील बहिरा यांचा खुलासा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

वडिलोपार्जित जमिनीचे सिडकोकडून संपादन झाल्यानंतर कुटुंबाला साडेबारा टक्के योजनेअंतर्गत मिळालेल्या भूखंडासंदर्भात माझ्यावर केलेले सर्व आरोप निराधार असून माझा या व्यवहारात कुठलाही गैरव्यवहार नाही, असा स्पष्ट खुलासा माजी नगरसेवक सुनील बहिरा यांनी केला आहे.

तक्का (पनवेल) येथील वडिलोपार्जित जमिनीचे संपादन झाल्याने सिडकोने कामोठे येथे साडेबारा टक्के अंतर्गत भूखंड दिले होते. त्यावेळी वडील हयातीत नसल्याने संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी आणि सर्वस्वी अधिकार माझे मोठे भाऊ चंदर बहिरा यांना देण्यात आले होते. त्यावेळी मी लहान असल्याने मला या व्यवहाराची कुठलीही पूर्णता कल्पना नव्हती तसेच या सर्व प्रकारात आमच्याकडून सिडकोची कोणतीही फसवणूक झाली नाही. उलटपक्षी सिडकोकडून अद्याप आम्हाला दोन प्लॉट येणे बाकी आहे. अशातच लोकांच्या व्यवहारात नाक खुपसणाऱ्या आणि त्यातून आर्थिक मलिंदा शोधणाऱ्या गणेश वाघीलकरने कायम माझी बदनामी केला असल्याचा खुलासा माजी नगरसेवक सुनील बहिरा यांनी केला आहे.

सिडकोच्या कामोठे परिसरातील मौल्यवान भूखंड बळकावण्यासाठी मृत भावाला 'जिवंत' दाखवत बनावट कागदपत्रांची रांगोळी उभी केली अशा आशयाची बातमी काही वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्याने या बाबतीत सुनील बहिरा यांनी वस्तुस्थिती मांडत आपल्याला विनाकारण त्रास देण्यासाठी आणि समाजात असलेली प्रतिष्ठा कमी करण्यासाठी गणेश वाघीलकर यांच्याकडून वारंवार प्रयत्न होत असल्याचे सांगण्यात आले. सुनील बहिरा यांनी या संदर्भात खुलासा करताना सांगितले कि, आमची एकत्रित कुटुंबाची वडिलोपार्जित जमीन पनवेल येथे होती. या जमिनीचे सिडकोने संपादन केले त्या अनुषंगाने आम्हाला साडेबारा टक्के योजनेतून १३०० चौरस मीटरचा प्लॉट मिळणार होता. त्यापैकी ११०० चौरस मीटरचा भूखंड कामोठे मधील सेक्टर ३५ येथे देण्यात आला. वडील गोविंद काथोड बहिरा यांचे १९७७ साली निधन झाल्याने संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी कुटुंबातील मोठा भाऊ चंदर गोविंद बहिरा यांच्यावर आली होती. आणि त्यानुसार कुटुंबाची जबाबदारी आणि सर्व अधिकार कुटुंबांनी त्यांना दिली होती. त्याच अनुषंगाने या जमिनीच्या संदर्भातील मुखत्यारपत्र अर्थात पॉवर ऑफ अटर्नी त्यांना देण्यात आली होती. २००६ साली या जमिनीचा व्यवहार झाला होता आणि त्यावेळी विशेषत्वाने अशा व्यवहारांची आपल्याला कुठलीच कल्पना आत्मसात नव्हती त्याचबरोबर सर्वाधिकार मोठ्या भावाला दिल्याने त्यामध्ये दुमत नव्हते. त्यावेळी कुटुंबातील सदस्य म्हणून मी भावाने बोलावल्याप्रमाणे स्वतःच्या नावावर आपली सही दिली आणि बाकीच्या व्यवहारात ढवळाढवळ केली नाही. त्यामुळे मी या व्यवहारात काहीही खोटे केले नाही हे स्पष्ट झाले आहे. मात्र मी माझ्या कुटुंबाच्या उदरनिर्वाह करण्यासाठी काहीही व्यावसायिक कामे हाती घेतली कि गणेश वाघिलकर हा इसम वारंवार आडमुठी भूमिका घेऊन सततचा नाहक त्रास देण्याचा प्रयत्न करत असतो. त्याने गावातील इसमांना मध्यस्थी टाकून अनेकदा माझ्याकडे पैशाची मागणी केली मात्र मी पैसे देत नसल्याने त्याने माझ्या विरोधात वैयक्तिक राग काढून विविध प्रशाशनाकडे सातत्याने तक्रारी अर्ज केले आहेत. पण या माध्यमातून गणेश वाघिलकरला सांगू इच्छितो कि, तू कितीही मला त्रास देण्याचा आणि कोणत्याही प्रकरणात गुंतविण्याचा प्रकार केला तरी मी तुझ्या कपटी मनसुब्यांना भीक घालणार नाही हे लक्षात घे. मी काहीही खोटे केले नाही त्यामुळे त्याला पैसे देण्याचा संबंध येत नाही. माझे नाव कुटुंबातील सदस्य म्हणून कागदपत्रांवर आहे, प्रत्यक्षात या प्रकरणाशी त्यांचा काहीही संबंध नाही आणि असे असताना गणेश वाघिलकर कडून वेगवेगळ्या गैरसमजांना वाव देण्याचा, कुटुंबात तेढ निर्माण करण्याचा आणि सामाजिकदृष्ट्या मला नाहक बदनाम करण्याचा व त्याला खतपाणी देण्याचा प्रयत्न केला जात आहे, असेही सुनील बहिरा यांनी स्पष्ट केले. गणेश वाघिलकरवर महिलांची छेडछाड केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात कलम ३५४ नुसार गुन्हा दाखल आहे आणि त्याचा द्वेष घेऊन तो माझ्या विरोधात कुरापती करत असतो. या सर्व प्रकरणी योग्य तो कायदेशीर सल्ला घेऊन कायदेशीर कार्यवाही मी सुरु करत आहे. तसेच जाणीवपूर्वक माझी बदनामी व माझ्यावर चुकीची फौजदारी तक्रार केल्याबद्दल योग्यवेळी कायदेशीर कारवाई करणार आहे, असेही माजी नगरसेवक सुनील बहिरा यांनी नमूद केले.

## ऐतिहासिक! राम राज्यातील 'कोविदार' वृक्षाचे सारोळा मठात विधिवत रोपण; अयोध्येतील 'जय ध्वजा'वरील चिन्हाचा मान!

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

सिल्लोड: अयोध्येतील श्रीराम मंदिरावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नुकत्याच आरोहित झालेल्या **'जय ध्वजा'**वर असलेले राम राज्यातील राजवृक्ष 'कोविदार' (रक्त कांचन) याचे ऐतिहासिक रोपण सिल्लोड तालुक्यातील



सारोळा येथील गहिनीनाथ महाराज देवस्थानाच्या प्रांगणात झाले आहे. अयोध्या येथील ध्वजारोहणाच्या निमित्ताने, देशभरात सर्वप्रथम या वृक्षाचे विधिवत रोपण करण्याचा मान सारोळा येथील मठाला मिळाला आहे, ही परिसरासाठी अत्यंत गौरवाची बाब आहे.

अयोध्या ते सारोळा: 'जय ध्वजा'चा संदेश!

अयोध्येतील 'जय ध्वजा'वर राम राज्यातील राजवृक्ष असलेल्या कोविदार (रक्त कांचन), 'ओम' आणि 'सूर्य' ही तीन तेजस्वी रूप चिन्हे अंकित आहेत. कोविदार वृक्ष आणि हा धर्मध्वज पराक्रम, समृद्धी, ऊर्जा आणि धर्मरक्षेचे प्रतीक मानला जातो. वन्य अवस्थेत आढळणाऱ्या या दुर्मिळ वृक्षाचे महत्त्व अयोध्येतील या ध्वजारोहणाने अधिकच वाढले आहे.

या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी, दत्त जयंतीच्या पवित्र मुहूर्तावर सारोळा येथील मठात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मठाधीपती बालयोगी जगन्नाथ गिरी महाराज यांच्या हस्ते, अभिनव प्रतिष्ठानचे अध्यक्ष माजी नगराध्यक्ष किरण पा. पवार आणि आर.एस.एस. चे गतीविधी सह कार्यवाह डॉ. संतोष पाटील यांच्या उपस्थितीत कोविदार वृक्षाचे विधिवत रोपण करण्यात आले.

यावेळी अन्वी, सारोळा, रहीमाबाद आणि पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. अयोध्येच्या पवन स्पर्शाने पवित्र झालेल्या या वृक्षाच्या रोपणाने सारोळा येथील देवस्थानाच्या वैभवात भर पडली असून, हा वृक्ष परिसरात धर्मरक्षा आणि समृद्धीचे प्रतीक म्हणून ओळखला जाईल, यात शंका नाही.

# धोत्रे खुर्द शाळेचे सचिन ठाणगे 'आयडॉल शिक्षक'; नवकल्पनाशील कार्याची राज्यभरात दखल

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे**

: ग्रामीण भागातील शिक्षणव्यवस्थेत सकारात्मक आणि गुणात्मक बदल घडवणारे शिक्षक म्हणून ओळख निर्माण केलेले धोत्रे खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक सचिन ठाणगे यांची यंदाच्या 'आयडॉल शिक्षक' उपक्रमासाठी निवड झाली असून, त्यांच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेत हा मानाचा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू झाला असून, तालुक्यातील उत्तम, प्रेरणादायी आणि विद्यार्थीकेंद्रित कार्य करणाऱ्या शिक्षकांना हा सन्मान दिला जातो. ठाणगे सरांनी गेल्या काही वर्षांत अध्यापनात केलेली नाविन्यपूर्ण प्रयोगशीलता सर्वत्र चर्चेचा विषय ठरली आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती विकसित करणे, जीवनकौशल्यांचा विकास, मूल्याधिष्ठित शिक्षण, तसेच नव्या शैक्षणिक पद्धतींचा प्रभावी वापर या माध्यमातून त्यांनी शाळेची गुणवत्ता लक्षणीयरीत्या उंचावली. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, प्रकल्पाधारित शिक्षण, विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक प्रतिभेला वाव देणारे उपक्रम आणि प्रेरक वातावरण निर्मिती या सर्व गोष्टींमुळे धोत्रे खुर्द शाळा आज गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे आदर्श केंद्र ठरत आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थी शहरातील विद्यार्थ्यांपेक्षा मागे राहू नयेत म्हणून त्यांनी सातत्याने घेतलेला मेहनतीचा ध्यास उल्लेखनीय आहे. पालकांचा सहभाग वाढवणे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणे आणि शाळेची शैक्षणिक प्रगती सुनिश्चित करणे या दिशेने त्यांनी केलेले श्रीमंत योगदान तालुक्याच्या



शैक्षणिक इतिहासात महत्त्वाचे मानले जात आहे. ठाणगे सरांच्या या निवडीबद्दल अहिल्यानगर जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, गटशिक्षणाधिकारी कांतिलाल ढवळे, विस्तार अधिकारी चांगदेव गवळी, तसेच उत्तम फंडे यांनी अभिनंदन करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे. विद्यार्थ्यांपासून पालकांपर्यंत सर्वांमध्ये आनंदाची लहर पसरली असून ही निवड संपूर्ण तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

ग्रामीण भागात शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी केलेल्या ठाणगे सरांच्या अथक प्रयत्नांची ही शासन मान्यता ठरली असून, त्यांचा प्रवास अनेक शिक्षकांसाठी प्रेरणादायी आदर्श ठरत आहे.

# उरण येथील वायूविद्युत निर्मिती प्रकल्पा मधून

**दीपक पाटील सेवा निवृत्त**
**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

उरण येथील महाराष्ट्र वीज महामंडलाच्या वायूविद्युत निर्मिती प्रकल्पा मधून बोकडवीरा गावांतील प्रकल्पग्रस्त दीपक भालचंद्र पाटील हे आपल्या15 वर्षाचा सेवाकार्यकाल पूर्ण करून नोव्हेंबर 2025 अखेर सेवा निवृत्त झालें आहेत.

सतत हसतमुखाने आणि आपल्या मृदूभाषेने सर्वांची मने जिंखून घेणारे दीपक पाटील यांचे खरे जीवन अत्यंत संघर्ष मय असून त्यांनी हा संघर्ष कधी कुणाला जाणवू दिला नाही बालपणीच पितृछात्र हरविल्याने लहान भाऊ असूनही दीपाक पाटीलने आपली आई,दोनभाऊ,दोन बहिणी आणि दोन आजी याची जबाबदारी सांभाळून मिळेल तेकाम आनंदाने करून आपले आणि भावडांचे शिक्षण पूर्ण केले.

संघर्षमय जीवनात हळूहळू जबाबदारी वाढत गेली."प्रयत्नाअंती परमेश्वर असतो" या एकाच वाक्याचा बोध घेत त्यांनी आपली कुटुंब व्यवस्था खंबीर पणे सांभाळली,हि सारी तारेवरची कसरत करीत असताना उरण तालुक्यात उत्तम फलंदाज म्हणून त्यांनी आगळा



वेगळानाव लौकिक मिळविला मोठे भाऊ हेमंत पाटील हेही उत्तम फलंदाज होते परिसरांतील क्रिकेट शौकीन या भावांची ओपनिंगची फलंदाजी पाहण्यासाठी मोठया संख्यने येत असत.दीपक पाटील हे केवळ क्रिकेटच नाहीतर उत्तम कब्बडी आणि बुद्धिबळ खेळाडू ही होते.

एका शिपिंगकंपनीच्या कंटेनर यार्डमध्ये काम करीत असातना प्रकल्पग्रस्त म्हणून उशिरा का होईना त्यांना उरण-बोकडवीरा येथील येथील महाराष्ट्र वीज महामंडळाच्या वायूविद्युत निर्मिती प्रकल्पा मधून नोकरी साठी बोलविण्यात आले, त्यावेळी झालेल्या मुलाखती मध्ये चांगल्या गुणाने पास झाल्यानंतर नोकरीचे प्रथमीक सर्व सोपस्कार पूर्ण करून दीपक पाटील हे कोकणातील चिपळूण येथील पोफळी येथील वीज निर्मिती प्रकल्पात आपल्या सेवेची 2010 साली कारकीर्दसुरु केली.

त्यानंतर तब्बल दोन वर्षाच्या कालवधी मध्ये दीपक पाटील यांची नियमाला अनुसरून उरण-बोकडवीरा येथील महाराष्ट्र वीज महामंडलाच्या वायूविद्युतनिर्मिती प्रकल्पा मध्ये बदली झाली त्यानंतर 15 वर्षाचा सेवा कार्यकाल पूर्ण करून दीपक पाटील हे नोव्हेंबर 2025 अखेर सेवनिवृत्त झाले आहेत, प्रकल्पाच्या प्रथेप्रमाणे त्यांना प्रकल्पाच्या प्रशासकीय भवनाजवळील भव्य प्रांगणात विद्युत निर्मिती प्रकल्पाचे सर्व प्रशासकीय अधिकारी कर्मचारी, परिवारांतील सर्व सदस्य यांचा उपस्थितीत त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. ते स्वतः वायूविद्युतनिर्मिती प्रकल्पा मधीलएका युनियनचे मुख्य असलाने तसेच त्यांच्या सुविद्य पत्नी यासौ.निर्मला पाटील या काँग्रेसपक्षाच्या उरण तालुकाध्यक्षा असल्याने काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा अंतरराष्ट्रीय कीर्तीचे कामगार नेते महेंद्र घरत हे या कार्यक्रम साठी आर्जवून उपस्थित होते त्याच बरोबर उरण उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील,किरीट पाटील,जयवंत पाटील,संदीप पाटील काँग्रेस पक्षाच्या महिला विभागाच्या जिल्हाध्यक्षा श्रीमती रेखाताई घरत,जेष्ठपत्रकार प्रदीप पाटील,आणि समस्त पाटील परिवार,हितचिंतक मोठया संख्येने उपस्थित होते या सर्वांनी त्याना हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी अंतर राष्ट्रीय कीर्तीचे शासनाचे सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दत्ताभोईर यांच्या दत्तमाउली कलामंच च्या वतीने सुस्वर गायनाचा कार्यक्रम सदर करण्यात आला.शेवटी सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला.

# निफाडमध्ये महसूल विभागाची धडक कारवाई; अवैध खनिज वाहने जप्त, लाखोंचा दंड ठोठावला!

## तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाची कारवाई; चार वाहन ताब्यात, ₹5.84 लाख दंडाची धडक!

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**निफाड :-** निफाड तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतूक यावर नियंत्रण आणण्यासाठी महसूल प्रशासनाकडून विशेष मोहीम राबवण्यात आली. तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने विविध परिसरात गस्त घालत वाहने तपासली. यावेळी खडी व मातीची अवैधरित्या वाहतूक करणारी चार वाहने अडवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे तालुक्यातील अनधिकृत खनिज वाहतूकदारांना खबरदारीचा इशारा मिळाला आहे.

कारवाईदरम्यान हस्तगत करण्यात आलेली वहाने

चेतन भंडारी – MH 15 JW 2787 (हाफ बॉडी डंपर)

खडीची अवैध वाहतूक करताना आढळले. वाहन जप्त करून ₹1.18 लाखांचा दंड आकारण्यात आला.

बाळासाहेब चौधरी – चेसी नंबर MAT448832K3G18722 (हायवा)

मातीची परवानगी नसलेली वाहतूक करताना तपासणीदरम्यान उघड झाले. या वाहनावर ₹2.30 लाख दंड ठोठावण्यात आला.

नीरज चोरडिया – MH 15 KJ 9339



(हाफ बॉडी डंपर)

खडी वाहतूक करणारे हे वाहन परवानगीविना असल्याचे आढळले. या वाहनावरही ₹1.18 लाख दंड आकारण्यात आला.

अब्बास सय्यद – MH 05 4322 (हाफ बॉडी डंपर)

अवैध खनिज वाहतूक प्रकरणात ताब्यात घेऊन ₹1.18 लाख दंड लावण्यात आला.

तहसीलदारांच्या पथकाने या कारवाईदरम्यान वाहतुकीची कागदपत्रे, रॉयल्टी पावत्या, परवाने आणि मालाचा तपशील यांची तपासणी केली. नियमबाह्य वाहतूक आढळल्याने संबंधित सर्व वाहने ताब्यात घेण्यात आली. महसूल प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार तालुक्यात वाढत चाललेल्या अवैध खनिज वाहतूक प्रकरणांवर नियंत्रण मिळवणे हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. अवैधरित्या खनिज उत्खननामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान तर होतेच, पण पर्यावरणावरही नकारात्मक परिणाम होत असल्याकडे प्रशासनाचे लक्ष वेधले जात आहे.

*महसूल विभागाने पुढील काळातही अशा प्रकारच्या मोहीमा सातत्याने राबविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. तालुक्यात अवैध उत्खनन करणाऱ्यांना कोणतीही सूट दिली जाणार नसून नियमांचे पालन करूनच खनिज वाहतूक करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.*

**तहसीलदार:- विशाल नाईकवाडे**

कारवाईत झालेल्या सहभागी पथका मध्यें विशाल नाईकवाडे,तहसीलदार, निफाड,जयंत लिलके,मंडळ अधिकारी,ज्ञानेश्वर केसरे मंडळ अधिकारी,अश्विनी भोसले मंडळ अधिकारी,अमोल चव्हाण तलाठी,राहुल अहिरे तलाठी,दीपक पवार तलाठी,राहुल भांगरे तलाठी आदींचा समावेश आहे.

# उरण शहरातील दत्तजयंती उत्सव निमित्ताने भरणाऱ्या यात्रेचा शतकोत्सवासवाचा प्रवास.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/प्रतिनिधी**

दत्त जयंती ही हिंदू पंचांगात असलेल्या मार्गशीर्ष पौर्णिमा या तिथीला साजरी केली जाते. हा दिवस म्हणजे भगवंत श्री दत्तात्रेय यांचा जन्मदिवस म्हणून साजरा केला जातो. देशभरात विशेषता महाराष्ट्रात हिंदू दिनदर्शिकेनुसार मार्गशीर्ष महिन्याच्या पौर्णिमेच्या दिवशी हा उत्सव साजरा केला जातो.

उरण शहरातील दत्त जयंतीचे हे ९९ वेळ वर्ष आहे.सन १९२६ पासून या दत्त उत्सवानिमित्त यात्रेची सुरुवात झाली. २०२६ रोजी या यात्रेचे १०० वर्ष शतकपुर्ती होणार आहे .या यात्रेत हजारो भाविक सहभागी होतात, आणि या यात्रेदरम्यान उरण शहरातील विविध दत्त मंदिरात हि विशेष गर्दी होत असते.

सकाळपासूनच श्री दत्त अभिषेक, पुजा विधी, जन्मोत्सव व रात्री पालखी मिरवणूक काढण्यात येते. दिवसभरात विविध धार्मिक कार्यक्रमांची व दुपारी महाप्रसाद ठेवण्यात येतो. दत्तजयंती च्या यात्रेचे औचित्य साधून विविध सामाजिक संस्था कडून आरोग्य शिबिर,पाणी,व अन्नदानासारखे सामाजिक उपक्रम राबवण्यात येतात.

या यात्रेमध्ये स्थानिक भक्त आणि पर्यटक सहभागी होत असतात. दत्त जयंतीच्या यात्रेदरम्यान वैष्णवी हॉटेलपासून चार फाटा आणि कोटनाका यासारख्या



भागांमध्ये विविध प्रकारची शेकडो दुकाने लावली जातात.

उरण शहरातील एन. आय. हायस्कूल समोरील पटांगणात सर्वांसाठी आकाश पाळणे 'मौत का कुवा 'तोरा तोरा 'ड्रॅगन ट्रेन' कोलंबस ,'मिनी ट्रेन',आदि करमणुकीची साधने लावण्यात येतात. त्याचप्रमाणे खाण्यापिण्यासाठी ठिकठिकाणी पावभाजी, पिझ्झा ,मालवणी खाद्य प्रकार, स्पेशल दुधी हलवा,नूडल्स ,कुल्फी अशा विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लावण्यात येतात. या यात्रेत हार, फुले, पेढे, नारळ, मिठाईची दुकाने, अलंकार , विविध भांडे, वस्तू , कपडे ,प्लास्टिक च्या गृह उपयोगी वस्तू ,बच्चे कंपनीसाठी आकर्षक खेळणी आदींची मोठ्या प्रमाणावर दुकाने थाटली जातात.

यात्रा म्हणजे सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचे असते यात्रेमुळे धार्मिक श्रद्धा वाढते तसेच विविध संस्कृती आणि सामाजिक घटकांचे एकत्रीकरण होते. विचारांची देवाणघेवाण होते. यात्रेमध्ये धार्मिक विधी कीर्तन भजन यासारख्या कार्यक्रमांचा समावेश असतो .अनेकदा ती एक सामाजिक अर्थव्यवस्थेचा भाग म्हणून हे काम करते. अनेक लोकांसाठी रोजगाराची संधी उपलब्ध होत असते. विविध सामाजिक स्तरातील लोक एकत्र आल्यामुळे सामाजिक एकात्मताही वाढते.उरण च्या परिसरातील प्रत्येक घरात गोडधोड आणि पाहुण्यांची रेलचेल माहेरवाशीणींचे येणे होत असते.

उरणची दत्त जयंतीची हि यात्रा धार्मिक सोहळ्यासोबतच सांस्कृतिक रूढी ,परंपरेचा वारसा जपत असून आता ती शंभराव्या वर्षात पदार्पण करत आहे भक्ती, श्रद्धा आणि एकोपा यांचा संगम या यात्रेत पाहावयास मिळत आहे.

# लासलगाव विंचूरमध्ये मोबाइल मटका जोरात

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी लासलगाव महेश साळुंके**

गेल्या काही महिन्यांपासून लासलगाव विंचूर शहरात सुरू असलेले मटका अड्डे आता नवीन तंत्रज्ञानाचा आधार घेत वाढले आहेत. मोबाइलवरून बुकिंग घेण्यासह मटक्याची रक्कम थेट संबंधितांच्या बँक खात्यात जमा करण्याचीही पद्धत वापरली जात आहे. शहरात अनेक ठिकाणी भरवस्तीत आणि वर्दळीच्या ठिकाणी खुलेआम मटका अड्डे सुरू आहेत. लासलगाव विंचूर परिसरात जुने मटका किंग पुन्हा सक्रिय झाले आहेत, त्यामुळे मटका अड्ड्यांना पोलिसांकडून अभय मिळत असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

लासलगाव शहरातील बाजारातळ,निमगावरोड परिसर व विंचूर येथील लासलगाव रोड, मच्छी मार्केट मधील पाण्याच्या टाकी खाली, आदिवासी वस्ती हा दोन नंबर धंद्यांमधील जुना अड्डा समजला जातो. अनेक अवैध धंदे या परिसरात सुरू असतात, त्यामुळेच लासलगाव पोलिस ठाण्यात विंचूर ओपीची जागा मिळवण्यासाठी कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांमध्ये चढाओढ असते. ही चढाओढ अवैध धंदे थांबवण्यासाठी नसून, वरकमाईसाठीच असल्याचे यापूर्वीही अनेकदा स्पष्ट झाले आहे. सध्याही तीच स्थिती आहे. गजबजलेल्या लोकवस्तीचे कार्यक्षेत्र असलेल्या विंचूर ओपी व लासलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत मटका आणि जुगार खेळणाऱ्यांनी नवीन ठिकाणे तयार केली आहेत. जुगारांच्या क्लब वर पण आता मोबाइल मटकाही सुरू आहे. मोबाइलवरून मटक्याचे आकडे लावण्याची सुविधा बुकींनी सुरू केली आहे. यासाठी मटका खेळणाऱ्या नेहमीच्या ग्राहकांना ठराविक मोबाइल नंबर पुरवले जातात. हे नंबर ठराविक दिवसांनी बदलतात. मटका लागलेल्या व्यक्तीला मोबाइलवरूनच माहिती पुरवली जाते. विशेष म्हणजे मोठ्या रकमेसह खेळणाऱ्यांना बँकिंग सुविधाही पुरवली जात आहे. मटका खेळणाऱ्यांना रक्कम घेण्यासाठी जावे लागू नये, यासाठी बुकीकडे असलेल्या कार्यकर्त्यांच्या खात्यावरून मटक्याची रक्कम खेळणाऱ्यांच्या नावावर ऑनलाइन वर्ग केली जाते. या प्रकारामुळे लोकांच्या नजरेत न येताही मटका खेळता येत असल्याने तरुण आणि पांढरपेशा वर्गही मटक्याकडे आकर्षित होत आहे.

मटका व जुगार क्लबवाल्यांना पोलिसांचेच अभय मिळत असल्याने भरवस्तीतही अड्डे सुरू आहेत. विंचूर येथील येवला रोडवर एका बंद पडलेल्या ढाब्या मध्ये, विंचूर येथील दशक्रिया विधी हॉलमध्ये, विंचूर बस स्टँड च्या पाठीमागे, आदिवासी वस्तीमध्ये जुगार अड्डे सुरू आहे. या अड्ड्यांवर मोबाईलवर मटका स्वीकारला जातो , तसेच लासलगाव बाजार तळ, निमगाव रोड येथे काही ठराविक वेळेत मटका घेणारे लोक घुटमळत असतात. सकाळी आणि संध्याकाळी मटका घेण्याच्या ठराविक वेळेत चौकांमध्येच स्कुटी व मोटरसायकलवर काही लोक उभी असतात. पोलिसांच्या दुर्लक्षामुळे जुने मटका किंगही नव्याने सक्रीय झाले आहेत, यामुळे लासलगाव विंचूर परिसरातील मटक्याची उलाढल कोटीच्या घरात पोहोचली आहे.

**कमिशनवर आकडे**

कोणत्या दिवशी मटक्याचा कोणता आकडा निघेल याचे भाकीत करणारीही एक यंत्रणा सक्रीय आहे. नव्याने खेळण्यासाठी येणाऱ्यांना ही यंत्रणा मार्गदर्शन करते. खेळणाऱ्यांना मटक्याची चटक लागल्यानंतर कमिशनवर संभाव्य आकडे पुरवले जातात. लागणाऱ्या रकमेतील दहा ते पंचवीस टक्के रक्कम देण्याच्या बोलीवर संभाव्य आकडे सांगितले जातात. संध्याकाळी लासलगाव बाजारतळ परिसरात काही वेळ थांबल्यास या यंत्रणेचा अनुभव येतो.

**पोलिसांचे दुर्लक्ष की अभय?**

राजरोसपणे सुरू असलेले मटका अड्डे पोलिसांना माहीत नसावेत हे आश्चर्यकारक आहे. विंचूर ओपी च्या आसपास लासलगाव पोलिस ठाण्याच्या जवळ असलेल्या बाजार तळात फेरी मारल्यानंतरही मटका अड्ड्यांचे वास्तव लक्षात येते. कचऱ्याचे ढीग तपासले तरीही मटक्याच्या पाटीभर चिठ्ठ्या मिळतात. आत्म विश्वस दुणावलेले बुकी उघडपणे अड्डे सुरू करीत आहेत. यानंतरही पोलिसांच्या कारवाया केवळ कागदोपत्री होत राहतात हे विशेष.

लासलगाव पोलीस स्टेशनचे इन्स्पेक्शन संपन्न होईपर्यंत चोरून लपून मोबाईलवर मटका सुरू होता आता लवकरच खुले आम मटका सुरू होईल अशी माहिती नाव न छापण्याच्या अटी वर एका कसलेल्या मटका खेळाडूंनी दिली आहे

# नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखा, कक्ष २ यांनी गहाळ झालेले ८,९२,५७४/- किंमतीचे ५३ मोबाईल फोन मुळ मालकांना केले परत

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखा, कक्ष २ यांनी गहाळ झालेले ८,९२,५७४/- किंमतीचे ५३ मोबाईल फोन मुळ मालकांना परत केले आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत असणाऱ्या पोलीस ठाणेकडे विविध इसमांकडून मोबाईल गहाळ झालेबाबतच्या तक्रारी नोंद करण्यात येतात. सदर तक्रारी नोंद करण्यात आल्यानंतर पोलीस ठाणेकडून गहाळ झालेल्या मोबाईलची माहिती "CEIR" या शासकीय पोर्टलवर भरण्यात येते. सदर पोर्टलवर गहाळ झालेल्या मोबाईल फोनची माहिती गुन्हेशाखा प्राप्त करते. गहाळ मोबाईल "CEIR" या शासकीय पोर्टलचे सहाय्याने व तांत्रिक तपास करुन गहाळ मोबाईलमध्ये नवीन मोबाईल नंबर निष्पन्न झाल्यानंतर महाराष्ट्र तसेच विविध राज्यातील इसमांना सदर मोबाईल नंबरवर संपर्क करुन मोबाईल धारकास मोबाईलचे वस्तुस्थितीबाबतची माहिती देवुन त्यांचेकडुन सदरचे मोबाईल फोन प्राप्त केले जातात. त्यानुसार सप्टेंबर २०२५ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत गहाळ झालेले ८,९२,५७४/- किंमतीचे ५३ मोबाईल फोन कक्ष २, गुन्हे शाखेकडून प्राप्त केले. सदरचे ५३ मोबाईल फोन



मुळ मालकांना परत देण्यात आले आहेत. गहाळ झालेले मोबाईल फोन परत मिळाल्याने मोबाईल मालकांनी त्याबाबत आनंद व्यक्त करुन नवी मुंबई पोलीसांचे कौतुक केले. तसेच भविष्यात ही पोलीसांनी अशीच चांगली कामगिरी करावी असे मत व्यक्त केले. सदरची उल्लेखनीय कामगिरी नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, सचिन गुंजाळ, सहा. पोलीस आयुक्त, अजयकुमार लांडगे, गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली व वपोनि अनिल पाटील, कक्ष २, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचे देखरेखीखाली मपोहवा सुनिता चंदगीर, पोशि संतोष तांदळे, मपोशि स्नेहा गायकवाड यांनी केली आहे.